शुक्रवार, १ सप्टेंबर २०२३
⦿ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⦿ मराठी ⦿ दैनिक
⦿ वर्ष - ०३ ⦿ अंक - ३४
⦿ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● FRIDAY 1 SEPTEMBER 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-34 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# शेतकऱ्याने पिकावर फिरवला नांगर

## हुमनीचा प्रादुर्भाव : नांदेड जिल्ह्यात दुष्काळाचे संकट



आधुनिक केसरी न्यूज

**सिध्दार्थ वाठोरे**

**हदगाव : निसर्गाचा लहरीपणा, कोरडा दुष्काळ, त्यात हुमनीच्या प्रादुर्भावामुळे हदगाव तालुक्यातील हरडफ येथील प्रगतीशील शेतकरी पांडुरंग ग्यानोबाराव सुर्यवंशी यांनी गुरुवारी हुमनीला कंटाळून आपल्या शेतातील जवळपास १५ एकरातील उभ्या सोयाबीन पिकावर नांगर फिरवला. नांदेड जिल्ह्यात दुष्काळाचे संकट पुन्हा एकदा गडद झाले आहे. शेतकरी हाताश झाला आहे. दुष्काळाचा दशावतार पाठ सोडत नसल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. ऑगस्ट महिना मावळतीकडे झुकला, मात्र पाऊस झाला नाही. खरीप हंगाम हातचा गेला आहे. थोड्याशा पावसावर सोयाबीनची लागवड केली. मात्र पेरणीनंतर पाऊसच झाला नसल्याने रोपटे सुकू लागली आहेत. वाढ खुंटली आहे, त्यात हुमनीच्या प्रादुर्भावामुळे उभ्या पिकात नांगर फिरवण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.**

हदगाव तालुक्यातील हरडफ येथील शेतकऱ्यांने सोयाबीनच्या उभ्या पिकांत ट्रॅक्टर घालून पीक आपल्या हाताने उद्धवस्त केले आहे. सोयाबीन या पिकांवर नांगर फिरवला आहे.
हरडफसह परीसरातील शेतकऱ्यांची हिच आवस्था आहे. मागील काही दिवसापूर्वी हरडफ येथील शेतकरी माधव उत्तमराव कदम या शेतकऱ्याच्या पाच एकर जमीनीवर हुमणी या रोगाची लागण झाल्याचे दिसून आले होते. शेतकऱ्यांवर अस्मानी संकट उभे असताना मात्र तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत अद्याप कुठलीही मदत मिळाली नाही. खरीप पिकांचे पंचनामे करुन तत्काळ नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. अनेक शेतकऱ्यांची कपाशी, सोयाबीन तूर मूग, उडीद ही पिके करपून गेल्याने व हुमणी या रोगाच्या प्रादुर्भावाने कुटुंब जागवायचे कसे, हा शेतकऱ्यांपुढचा खुप मोठा प्रश्न आहे. इथे राहून काय करावे, डोळ्यादेखत पिके जळत्यात ते पाहवत नाही, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. सततच्या दुष्काळी परिस्थितीने शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आला आहे. शेतीत पेरणीसाठी खर्च केला पण हातात काहीच पडले नाही. कोरडी आश्वासने नको तर ठोस उपाय योजना करा, अशी मागणी परीसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

### चारा द्या, नाहीतर जनावरे तहसील कार्यालयात सोडू

**शांताराम मगर**

**वैजापूर :** तालुक्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने यंदाचे वर्षे कसे जाणार याची चिंता नागरिकांना भेडसावू लागली आहे . यावर्षी 'ना पाऊस ना धान्य' अशी काहीशी स्थिती निर्माण झाली आहे . विहिरी कोरड्याठाक पडल्या असून शेतीतील बोअरमध्ये पाण्याचा थेंबही शिल्लक नसल्याने पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे . त्यामुळे आगामी काळात आणखीनच भीषण परिस्थिती निर्माण होण्याची चिन्हं दिसत असल्याचे नागरिकांमधून वर्तविले जात आहे . दोन दिवसापूर्वी तहसील कार्यालयासमोर रुमणे आंदोलन करण्यात आले . तहसील कार्यालयात भेट घेऊन दुष्काळी परिस्थितीची सविस्तर माहिती दिली याची दखल घेत लोणीखुर्द सर्कल मध्ये टुनकी लोणीखुर्द तलवाडा, भादली येथे पीक पाहणी करून तहसीलदार सुनील सावंत यांनी शेतकऱ्याच्या व्यथा जाणून घेतल्या . **सविस्तर पान 6 वर**

# ईडी अदानींवर रीसर्च का करत नाही : राहुल गांधी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** नरेंद्र मोदी आणि अदानी यांचे नाते काय आहे, असे वृत्तपत्र म्हणत आहेत. त्यांनी ते नाते जाहीर करावे. ईडी अदानी यांच्यावर रिसर्च का करत नाही? हा मोठा सवाल आहे. भारताच्या प्रतिष्ठेचा विषय आहे, असे म्हणत राहुल गांधी यांनी गौतम अदानी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाचा उल्लेख करत आरोपांचा नवा बॉम्ब टाकला. इंडिया आघाडीच्या दोनदिवसीय बैठकीला गुरुवारी प्रारंभ झाला. काँग्रसचे खासदार राहुल गांधी बैठकीसाठी मुंबईत दाखल झाल्यानंतर लगेच पत्रकार परिषद घेतली. विशेष म्हणजे त्यांनी याबाबतचे आरोप करत असताना काही वृत्तपत्रांच्या बातम्यांचा देखील उल्लेख केला. याशिवाय भारताच्या प्रतिष्ठेचा हा प्रश्न आहे. जी 20 च्या परिषदेला विदेशातून येणारे सदस्य काही प्रश्न उपस्थित करत आहेत. तसेच ज्या वृत्तपत्रांमध्ये वृत्त छापून आले, त्यांच्याकडे सर्व पुरावे आहेत, असे राहुल गांधी म्हणाले. दोन प्रसिद्ध आर्थिक वृत्तपत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अदानी कुटुंबाशी संबंध आहे. अदानी कुटुंबियांनी शेअर्समध्ये सिक्रेटली गुंतवणूक केली. या परिवाराने आपले पैसे गुंतवले, असे द गार्डियन वृत्तपत्राने म्हटले आहे. तर दुसऱ्या 'फायनान्शियल टाईम्स' वृत्तपत्रातही म्हटले तसे म्हटले आहे, असा दावा राहुल गांधी यांनी केला. 1 बिलियन डॉलर भारतातून अदानींच्या कंपनींच्या नेटवर्ककडून वेगवेगळ्या देशात गेला आणि देशात आला. त्यातून अदानी यांनी आपले शेअर्सची किंमत वाढवली. त्याच किंमतीच्या फायद्यातून अदानी विमान, पोर्ट विकत घेत आहेत. त्यांना धारावीत मोठा प्रोजेक्ट मिळाले आहेत, असा आरोप राहुल गांधींनी केला.

# सप्टेंबर महिन्यात होणार दमदार पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पावसाने ऑगस्टमध्ये ब्रेक घेतल्यानंतर सप्टेंबर महिन्यात तरी चांगला पाऊस पडणार का याकडे सर्वांच्या नजरा लागलेल्या असतानाच हवामान विभागाच्या अंदाजानुसार सप्टेंबर महिन्यात चांगला पाऊस होणार आहे. संपूर्ण ऑगस्ट महिन्यात पावसाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये भारतीय हवामान विभागाच्या या अंदाजामुळे आशेचे चित्र निर्माण झाले आहे. सप्टेंबरच्या पंधरावड्यात दख्खनचे पठार आणि मध्य भारतात चांगला पाऊस होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने सप्टेंबर महिन्यातील चार आठवड्यांचा पावसाचा अंदाज जाहीर करताना ही माहिती दिली. भारतीय हवामान विभागाकडून सप्टेंबर महिन्यातील चार आठवड्यांचा पावसाचा अंदाज जाहीर करण्यात आला. आयएमडीने सप्टेंबर महिन्यात पावसाचे पुनरागमन होईल.



# मोदीजी 'हमे बिजली, पानी, रास्ता दो'


## चाळीस वर्षांपासून अंधारात राहणाऱ्या बहिणींचे मोदींना पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मागील 40 वर्षांपासून वीज, पाणी, रस्ता, नाली अश्या मूलभूत गरज्यांच्या अभावात राहणाऱ्या गडचांदूर शहरातील बंगाली कॅम्प येथील बहिणींनी रक्षाबंधनच्या पर्वावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना 'मोदीजी हमे बिजली, पाणी, रास्ता दो' अश्या आशयातून आमच्या समस्या सोडवा असे पत्र लिहून पाठवले.

कोरपना तालुक्यातील औद्योगिक शहर असलेल्या गडचांदूर नगरपरिषद क्षेत्रातील वार्ड क. 4. बंगाली कॅम्प येथील जवळपास 400 रहिवासी मागील 40 वर्षापासून विज, पाणी, नाली, रस्ते अशा मुलभूत सुविधांपासून वंचित आहेत, त्यांच्या वस्तीत विजेचे कनेक्शन नाही, नळाद्वारे पाणीपुरवठा होत नाही, नाली, रस्ते नाहीत करिता देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आज भाऊ बहिणींच्या रक्षाबंधन या पवित्र सणाच्या पर्वावर नरेंद्र मोदी यांना आपले भाऊ या नात्याने आम्हा बहिणी नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्या करिता 'प्रिय मोदीजी, हमे बिजली, पाणी, रस्ता दो' अश्या मागणीचे पत्र बंगाली कॅम्प वासीय महिलांनी व बालकांनी लिहून पाठवले आहे, सदर कार्यक्रम भारत राष्ट्र समिती च्या वतीने भूषण फुसे यांच्या नेतृत्वात करण्यात आला. यावेळी भारत राष्ट्र समितीचे नेते भूषण फुसे, जेष्ठ नेते रामदास चौधरी, महेंद्र ठाकूर, अश्विन वाघमारे तसेच मिथुन घुले, मंगला कुंभारे, लक्ष्मीबाई उंदीरवाडे, काजल मंडल, गोकुल विश्वास, सावित्री देवी पोद्दार, लिलाबाई बारापात्रे, हिराबाई मेकाले आदी स्थानिक बंगाली कॅम्प वासीय महिला शेकडो महिला भगिनी, बालक व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्षाबंधन या भाऊ - बहिनींच्या पवित्र सणाच्या पर्वावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पोस्टकार्ड पाठवून मागणीच्या या अनोख्या स्वरूपाची सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

त्याच्या साहाय्याने अधिक वजनाचा उपग्रह आपण प्रक्षेपित करू शकतो. चंद्रयान-३ मोहिमेसाठी जी एस एल व्ही मार्क -३ किंवा एल व्ही एम -३ असेही म्हटले जाते, त्याचा वापर करण्यात आला. त्यापूर्वी आपला उपग्रह ' आर्यभट्ट ' आपण १९७५ मध्ये अवकाशात सोडला होता पण त्यासाठी रशियन रॉकेटचे साहाय्य घ्यावे लागले होते. उपग्रह अवकाशात सोडण्यासाठी क्रायोजेनिक इंजिनची आवश्यकता असते. ते त्यावेळी भारताकडे नव्हते. क्रायोजेनिक इंजिनाचे तंत्रज्ञान अमेरिका, रशिया, जपान आदी निवडक देशांकडेच उपलब्ध होते. पण या देशांनी भारताला हे तंत्रज्ञान देण्यास नकार दिला. सर, पण हे देश भारताला हे तंत्रज्ञान द्यायला का तयार झाले नाहीत ? ' एका विद्यार्थिनीने प्रश्न विचारला. ' सांगतो. छान प्रश्न विचारलास. अमेरिकेसारख्या देशांना भीती वाटत होती की भारत या तंत्रज्ञानाचा वापर करून युद्धात हानी करणारे मिसाईल्स बनवू शकेल. त्यामुळे हे तंत्रज्ञान भारताला देणे त्यांना धोक्याचे वाटत होते. शिवाय करोडो डॉलर्स खर्च करून अंतराळात जाऊ पाहण्याऱ्या देशांना भारताने त्यांच्याशी स्पर्धा करू नये असेही वाटत होते. ' पण तुम्हाला अभिमानाने सांगतो की भारतीय वैज्ञानिकांनी हे आव्हान स्वीकारले. १९९४ मध्ये त्यांनी यावर संशोधन करायला सुरुवात केली. त्यानंतर बरोबर २० वर्षांनी भारताने विकसित केलेल्या क्रायोजेनिक इंजिनाच्या आधारे २०१४ मध्ये पहिल्या भारतीय उपग्रहाचे प्रक्षेपण केले आणि भारत अशा आघाडीच्या सहा देशांमध्ये जाऊन बसला. त्या आधी ५ ऑगस्ट १९६९ रोजी भारतीय अवकाश संशोधन संस्थेची म्हणजेच इस्त्रोची स्थापना करण्यात आली होती. अनेक अडथळे, अडचणींना तोंड देत इस्त्रोने आपली वाटचाल सुरूच ठेवली. २४ सप्टेंबर २०१४ रोजी आपले मंगळयान मंगळ ग्रहाच्या कक्षेत स्थिरावले. या पहिल्याच प्रयत्नात आपण यश प्राप्त केले आणि असे करणारा भारत हा जगातील चौथा देश ठरला. २०१९ मध्ये आपण ' शक्ती ' हे अँटी सॅटेलाईट मिसाईल सुद्धा विकसित केले. पण अर्थात तो वेगळ्या व्याख्यानाचा विषय आहे. उपस्थितांमधून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. तेवढ्यात एका विद्यार्थ्याने हात वर केला. तो म्हणाला, ' सर, या सगळ्या गोष्टी खूपच अभिमानास्पद आहेत पण क्रायोजेनिक इंजिन म्हणजे काय हे जरा स्पष्ट करून सांगाल का ? ' 'सांगतो ' डॉ राव म्हणाले. मला आनंद होतो आहे की तुम्ही या विषयात एवढा रस घेऊन ही माहिती समजून घेत आहात.



## समृद्ध प्राचीन भारत



## आनंदी पहाट

## अंतर्मनाला सुखावणाऱ्या अनुभूती आनंदच देतात

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अनेकदा नकारात्मक विचारच आपले नुकसान करतात. येणाऱ्या अनेक विचारांमध्ये नकारात्मक विचार आपल्याकडून अनावधानाने आपलेसे केले जातात. ह्या नकारात्मक विचारांचा पगडा आपल्या अंतर्मनावर अधिक बसला तर त्याचे परिणाम विपरीत होत असल्याचे अनुभवायला येऊ लागते. आपल्या गत आयुष्यात रममाण व्हायला आपल्याला प्रत्येकालाच हवे असते, ते अधिक प्रियही असते. आपल्या प्रत्येकाच्याच साठवणीतल्या अनेक आठवणी असतात. हर्षाच्या-स्पर्शाच्या, घरच्या-दारच्या, प्रीतीच्या-मैत्रीच्या, स्पर्धेच्या-बक्षिसांच्या, शाळेच्या- कॉलेजच्या, बालपणीच्या-तारुण्याच्या; अशा एक नाही तर अनेकविध आठवणीत आपल्या अंतर्मनाला सुखावण्यासाठी अनेकदा त्या आपण स्मरत असतो. ह्यांत काही आठवणी सुखाच्या-दुःखाच्या, रागाच्या-वादाच्या, विरहाच्या-प्रहाराच्या, प्रयासाच्या-त्रासाच्या, मानाच्या-अपमानाच्या अशा मिश्र स्वरूपाच्याही असतात. कोणत्या आठवणी आपल्या अंतर्मनासमोरून कधी तरळून जातील, हे काही ठरलेले अथवा आपण ठरवलेले नसते. अनेकदा काही घटना आपण कितीही आठवायच्या ठरवल्या तरीही नीट, पूर्णपणे आठवता येतातच असे नाही; तर काही घटना मात्र अनावधानाने, आपोआप आपल्या डोळ्यासमोर पुनःश्च यायला लागतात. खरेच, ह्या मनाचे नेमके काय रसायन आहे, आपल्याला काही कळत नाही. आपण आणि इतरांनी परिधान केलेले कपडे, वापरलेल्या वस्तू, आपापसांत झालेला संवाद, घडलेल्या गप्पागोष्टी, त्या दरम्यानच्या शारीरिक हालचाली, आपापले हावभाव अशा अनेकविध गोष्टी आठवायला सुरुवात होते. ह्या आठवणींचे आपल्याशी एक जिव्हाळ्याचे नातेच निर्माण झालेले असते. आपले जगण्यापलीकडचे जीवन आनंदायी करण्याचे काम अनेकदा ह्या अशा आठवणीच करत असतात. काही आठवणी तर रात्री झोपेत आपल्याला पडलेल्या स्वप्नांच्या असतात. काहीवेळा तर ह्या आठवणीमध्ये आपण इतके रममाण झालेले असतो, कि वास्तवातले आणि वर्तमानातले कित्येक क्षण आपले फक्त शरीर प्रचीती घेत असते, पण मनाला त्याची अनुभूतीच मिळत नसते.



आधुनिक केसरी

**भाव अंतरंग | पांडुरंग ||**

भाव अंतरीचा | जाणतो श्रीरंग ||
सात्विकता भंग | करू नये ||१||
जगाला भुलवी | स्वतःला लाजवी ||
दर्पणा फसवी | कैसा सांग ? ||२||
मायावी सावली | देहाची ह्या जाण ||
आत्मा अधिष्ठान | चैतन्याचा ||३||
अहंकारी दर्प | नाश जीवनाचा ||
पाश विकारांचा | तोड आधी ||४||
साधावा सत्संग | होऊनी निस्संग ||
भाव अंतरंग | पांडुरंग ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

मङ्गला मधुरा चास्तां वाणी मे मङ्गले शिवे |
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ७९ || हे मंगले, शिवे, माझी वाणी पवित्र आणि मधुर असावी. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सूर्य उदय के होन में, नहिं सब ठौर प्रकाश ।
मधुविद्या के उदय में, भीतर बाह्य विकाश
।।२०।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल प्रथम अध्याय)
०४/०१/२०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
भौतिक सुर्य उगवल्यावर सर्वच ठिकाणी त्याचा प्रकाश पोहोचत नाही. गोलाकार पृथ्वी-मंडलाच्या सर्वच ठिकाणी सूर्याची किरणे पोहोचत नाहीत, पण ब्रम्हविद्येचा उदय झाल्यावर संपूर्ण देहात, आत्म-मंडलात आणि अंतःर्बाह्य सर्व ठिकाणी प्रकाश पूर्ण रूपात प्रगट होऊन समस्त अंधःकार दूर करून टाकतो.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

## आत्मदर्शन

आधुनिक केसरी

उदा,चांद्रभूमीवर भारताची मुद्रा,'चांद्रयान ३' मोहिमेत इस्त्रो ने रचलेला इतिहास हा होय. कारण आपले शास्त्रज्ञ पहिल्या दोन मोहिमेत अपयश आले म्हणून खचून गेले नाहीत. सांघीक प्रयत्नांचा हा अभूतपूर्व विजय मिळवता येतो हे या निमित्ताने सांगितल्या वाचून रहावेत नाही. यशाची संपन्नावस्था प्राप्त करण्यासाठी संम्पूर्ण समर्पित जीवन जगले तर ध्येय दूर नाही. हे या ठिकाणी लक्षात येते. मनुष्याच्या जन्माला आलो आहोत. मनुष्य प्राणी व वेगवेगळ्या संजीव प्राण्यात एक मुलभूत फरक आहे तो म्हणजे भावना,रागलोभ,चढाओढ, जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या जीवघेण्या स्पर्धा,आनंद दुःख हेवेदावे अशा अनेक चक्रव्यूहात अडकून न बसता स्वतः चा व आपल्या आप्तेष्टांचा सांभाळ करत जगायचे तर आहे पण यासाठी एक आदर्शवत विचारांची गरज आहे ही गरजेची वस्तू व विचार काही बाजारात जाऊन आणता येत नाहीत. तर समाज मनाचा आरसा असलेले सद्गुरू तुम्हाला या विचारांचा रस्ता दाखवतील मित्रांनो. पण यासाठी आत्मज्ञान असणे गरजेचेआहे.हे सुत्र या समासाचा अभ्यास करत असताना लक्षात आल्यावाचून रहात नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## वृत्ती भगवंताच्या ठिकाणी स्थिर ठेवावी

आधुनिक केसरी

माझा देह परमार्थाच्या आड येतो हे म्हणणे खरे नाही. तो मदत करतो किंवा आड येतो, या दोन्हीत विशेष तथ्य मानू नये. माझी वृत्ती कुठे गुंतते ते पाहावे. भगवद्भजनात दिवस घालवावा असे वाटू लागले, पण संगत मिळाली खेळ खेळणाऱ्याची. तेव्हा त्याचे मन कशाला मोडा असे म्हणून खेळ खेळू लागाला, भगवंताच्या स्मरणात राहण्याच्या वृत्तीपासून ढळू लागला, तर कसे होणार ? आईने आजवर खस्ता खाल्ल्या, लहानाचे मोठे केले, तीच आई लग्न झाल्यावर विषयाच्या आड येऊ लागली आणि म्हणून वैऱ्यासारखी वाटू लागली ! वास्तविक, दोघांच्याही देहांत फरक होण्यासारखे असे काहीच झाले नाही; पण वृत्तीत बदल झाला. विषयातच मी गुंतून राहू लागलो, याला काय करावे ? 'मी सुखी कशाने होईन' हे आपण आपल्या कल्पनेनेच ठरवले; पण या जगात पूर्ण सुख किंवा पूर्ण दुःख असे काही आहे का ? जे खरे असेल किंवा खोटे असेल याची आपल्याला खात्री नाही, त्या बाबतीत आपण रिकाम्याच कल्पना करीत बसतो. दुसरा मनुष्य ज्या वेळी आपल्याला त्रास देतो, त्या वेळी त्यामध्ये पन्नास टक्के आपली कल्पना असते. बाकी उरले पन्नास टक्के; त्याबद्दल 'त्याने दिलेला त्रास मी करून घेणार नाही' ही वृत्ती असावी, म्हणजे संपले ! आपली वृत्ती सारखी बदलते आहे, आणि जगही सारखे बदलते आहे. त्यामुळे अमुक परिस्थितीमुळे सुख किंवा अमुक परिस्थितीमुळे दुःख होते हे वाटणे खरे नव्हे, कारण सुखदुःख अस्थिर असते. शास्त्रांचे नियम हे वृत्तीला स्थिर करतात. भजन, पोथ्यावाचन, मंदिर बांधणे वगैरे गोष्टी जर वृती सुधारण्यासाठी न केल्या तर ती नुसती करमणूक होते, त्यापासून खरा फायदा होत नाही. आगगाडी रोज काशीला जाते, पण तिला काही काशीयात्रा घडत नाही. यात्रा घडते ती आत बसलेल्या लोकांना. गंगास्नान, विश्वेश्वराचे दर्शन वगैरे आतल्या लोकांना घडते. त्याचप्रमाणे, देहाने नुसता पूजापाठ वगैरे करून परमार्थ घडत नाही.. आपली वृत्ती भगवंताच्या ठिकाणी चिकटली पाहिजे. भगवंताचे रूप सारखे समोर ठेवता येणार नाही, पण त्याचे रूप लक्षात आले नाही तरी आपण त्याचे नाम घेतो हे लक्षात राहिले तर वृत्ती सुधारेल. आपल्या डोळ्यात अगदी बारीक कण गेला तरी तो खुपतो. त्याहीपेक्षा वृत्ती सूक्ष्म असते. ती भगवंताला कळते, म्हणजे त्याच्यापाशी लबाडी चालत नाही. विषयाचा भोग आला असता जो त्यामध्येच गुंतत नाही, त्याच्यावर भगवंताची खरी कृपा झाली असे समजावे. भगवंतापासून वेगळे न राहणे, त्याचे विस्मरण न होऊ देणे, त्याच्या स्मरणात राहणे, त्याच्या नामात राहणे, यांत खरे समाधान, शांती आणि सुख आहे.



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

आपल्या गुरूंनी सांगितलेल्या प्रमाणे वागणे हाच आपला परमार्थ समजा.



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

गुरू म्हणजे साक्षात परमात्मा. त्याची आज्ञा पाळणे हीच आपली तपश्चर्या. याहून वेगळे काही करण्याची गरज आहे असे न वाटावे. अनुग्रह लवकरात लवकर होण्या साठी "ओम नमो भगवते वासुदेवाय" हा मंत्र जपावा त्याने निश्चितच आपले गुरु जवळ येतात .ज्याला वेळीच गुरु भेटले त्याच्या आयुष्याचे कल्याण झाले .ज्याने आपल्या गुरूचा शोध च घेण्याचे ठरवले नाही त्याचे आयुष्य मात्र दिशा हिन च राहते. .त्यांची आठवण सार्वत्रिक ठेवणे म्हणजे सद्गुरूंचे होणे त्या शिवाय ते तुमचे होणार नाहीत. आपल्या सद्गुरुनी दिलेली नामसाधना , उपासना निष्ठेने करत राहिल्यास आपला प्रपंच आणि परमार्थ त्यांच्या सत्ते ने सुखकर होईल. सद्गुरुकडे जाऊन काय शिकावे ? तर मी पणा जाळणे आणि ईश्वर प्रप्तीची तळमळ शिकायला पाहिजे. आणि हे गुरूनी दिलेल्या नामाने साधते.

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

आकारेणैव चतुरास्तर्कयन्ति परेङ्गितम् ।
गर्भस्थं केतकीपुष्पमामादेनैव पदपदाः ॥
सरलार्थ - केवड्याच्या झुडपात कणीस उमलते आहे, हे भ्रमर केवळ वासावरूनच ओळखतात. तसेच चतुर लोक दुस-याच्या आकारावरूनच त्याच्या मनातले बरे वाईट भाव ओळखतात.
स्पष्टीकरण - काही माणसे अशी तल्लख बुद्धीची असतात, की ती समोर आलेल्या माणसाच्या डोळ्यावरून, मुखमुद्रेवरून व त्याच्या चुळबुळीवरून त्याच्या मनात काय आहे, ते अचूक ओळखतात. राजकारणी मुत्सद्द्यांच्याकडे पुष्कळदा अशी प्रखर तर्कबुद्धी असते, किंबहुना ती असावीच लागते.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १ सप्टेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# फडणवीसच सुपर सीएम; शिंदे फक्त चेहरा : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील तिघाडी सरकारमध्ये अंतर्विरोध आहे हे स्पष्ट झाले आहे. एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांच्यात अधिकारपदावरून स्पर्धा सुरू आहे. अजित पवार यांच्या दादागिरीचा अनुभव मविआ सरकारने पाहिला आहे, पण सध्या त्यांच्या दादागिरीला चाप लावला आहे. राज्यातील सरकारमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे केवळ चेहरा आहेत आणि खरे मुख्यमंत्री 'सुपर सीएम' हे देवेंद्र फडणवीसच आहेत, असा घणाघात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

टिळक भवन येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पत्रकारांशी बोलत होते. राज्यातील तिघाडी सरकारमध्ये मलईसाठी भांडणे सुरू आहेत. राज्यात दुष्काळाची स्थिती आहे, पिण्याचे पाणी नाही, चारा नाही, त्याकडे सरकारचे लक्ष नाही आणि तिन्ही पक्षात खुर्चीच्या वर्चस्वाची लढाई सुरू आहे. दोन दिवसापूर्वी मंत्रालयात शेतकऱ्यांनी जीवावर उदार होऊन आंदोलन करत सरकारकडे न्याय मागण्याचा प्रयत्न केला, पण या सरकारकडून न्यायाची अपेक्षा नाही. सरकार स्थापन होऊन दीड वर्ष होत आहे, पण अजून १७ जिल्ह्यांना पालकमंत्री नाहीत, मंत्रिमंडळाचा विस्तार करू शकत नाहीत. महाराष्ट्र झपाट्याने पिछाडीवर जात असताना सरकारमधील



मंत्री मात्र खोटे आकडे दाखवत जनतेची फसवणूक करत आहेत, असेही ते म्हणालेत.

मनसेने इंडिया आघाडीच्या बैठकीवर टीका केल्याच्या प्रश्नाला उत्तर देताना पटोले म्हणाले की, राज्यात दुष्काळाची परिस्थिती आहे, याची आम्हाला जाणीव आहे. देशभरातून इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत महाराष्ट्राच्या संस्कृती आणि परंपरेनुसार केले जाणार आहे. झुणका भाकर, वडापाव व पुरणपोळी हे महाराष्ट्राचे खाद्यपदार्थ जेवणात असणार आहेत, ही मेजवानी कशी? राज्यात दुष्काळी परिस्थितीला तिघाडी सरकारचा नाकर्तेपणा कारणीभूत आहे, मनसेने सरकारला जाब विचारला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्यालय टिळक भवन येथे आज भाऊ बहिणीचा पवित्र सण रक्षाबंधन उत्साहात साजरा करण्यात आला. माजी मंत्री तथा मुंबई विभागीय काँग्रेसच्या अध्यक्ष प्रा. वर्षा गायकवाड यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, माजी केंद्रीय मंत्री मिलिंद देवरा यांना राखी बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला. राज्यातील महिलांचे रक्षण करण्यास काँग्रेस पक्ष कटिबद्ध आहे अशा शुभेच्छा प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यावेळी दिल्या. या पत्रकार परिषदेला प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, माजी केंद्रीय मंत्री मिलिंद देवरा, आमदार वजाहत मिर्झा, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे, देवानंद पवार आदी उपस्थित होते.



## यदु जोशी, समिती सदस्यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य अधिस्वीकृती पत्रकार समितीचे अध्यक्ष यदु जोशी आणि समिती सदस्यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

राज्य अधिस्वीकृती समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तसेच पुढील वाटचालीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झालेल्या सत्कार कार्यक्रमाला समितीचे अध्यक्ष यदु जोशी, दैनिक पुढारीचे पत्रकार उदय तानपाठक, दिलीप सपाटे, नवशक्तीचे संपादक संजय मलमे, नवाकाळच्या नेहा पुरव, आयबीएन लोकमत गडचिरोलीचे महेश तिवारी आदी पत्रकार उपस्थित होते.

यदु जोशी आणि सदस्यांनी यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी पत्रकारांची निवृत्ती वेतनवाढ, निवासस्थानाचा प्रश्न, आरोग्यसुविधा, बैठकांसाठी मानधन, प्रवासभत्तावाढ आदी प्रश्न मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून सोडवण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

पत्रकारांच्या मागण्यांबाबत संबंधित विभागाकडून प्रस्ताव आल्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यसरकार सकारात्मक विचार करेल. अर्थ विभागाचे त्याला सहकार्य असेल, असे आश्वासनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ज्येष्ठ पत्रकार व राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदु जोशी आणि समिती सदस्यांना दिले.

## इस्त्रोच्या तोतया शास्त्रज्ञाला अटक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** चांद्रयान-3 च्या यशामुळे सर्व भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. सर्वांनाच इस्त्रोच्या वैज्ञानिकांचा अभिमान वाटतोय. इस्त्रोच्या वैज्ञानिकांमुळे भारताला आज हे यश मिळालय. सर्वत्र इस्त्रोच्या वैज्ञानिकाच कौतुक सुरु असताना एका व्यक्तीने दिशाभूल केली. आपण इस्त्रोचा वैज्ञानिक असल्याच सांगून त्याने फसवणूक केली. विक्रम लँडरच आपण डिझाईन केलं, असा तोतया शास्त्रज्ञाने दावा केला होता.

सूरत पोलिसांनी मंगळवारी हा दावा करणाऱ्या 40 वर्षीय व्यक्तीला अटक केली. आपण इस्त्रोशी जोडलेलो आहोत, हा दावा करणाऱ्या मेहुल त्रिवेदी विरोधात स्थानिक पोलिसांनी एफआयआर नोंदवला आहे. त्याने इस्त्रोच बनावट नियुक्तीपत्र बनवून घेतले होते. इस्त्रोच्या एका विभागात सहाय्यक चेअरमन म्हणून काम करत असल्याचा त्याने दावा केला होता. खरंतर मेहुल त्रिवेदी उपजिवीकेसाठी ट्युशन घेतो. त्याच्याकडे कॉमर्स शाखेतील पदवी आहे. आपणच लँडर मॉड्युल बनवल्याचा दावा करुन त्याने अनेक माध्यमांना मुलाखती दिल्या होत्या.

मेहुल त्रिवेदीला मिळणारी प्रसिद्धी पाहून भारतीय गोरक्षक मंचचे धर्मेंद्र गामी यांना संशय आला. त्यांनी शहराचे पोलीस आयुक्त अजय तोमर यांना अर्ज दिला. मेहुल त्रिवेदीच्या दाव्यावर संशय व्यक्त केला. त्रिवेदीचे दावे तपासण्यासाठी पोलीस आयुक्तांनी चौकशीचे आदेश दिले.

आम्ही इस्त्रोकडून मेहुल त्रिवेदीबद्दल माहिती मागवली. त्यांच्याकडून नकारात्मक प्रतिसाद आला. त्यानंतर आम्ही एफआयआर नोंदवून मंगळवारी त्याला अटक केली असे पोलीस निरीक्षक आरएस पटेल यांनी सांगितलं. आपल्या ट्युशन क्लासला लोकप्रिय करण्यासाठी त्याने हे सर्व केलं, असं पटेल यांनी सांगितलं. आयपीसीच्या कलम 417, 464, 468 आणि 471 अंतर्गत एफआयआर नोंदवण्यात आला आहे.

भारताच्या महत्त्वकांक्षी चांद्रयान-3 मिशनची 14 जुलैला सुरुवात झाली होती. 23 ऑगस्टला संध्याकाळी 6 वाजून 4 मिनिटांनी चांद्रयान-3 ने चंद्रावर यशस्वी सॉफ्ट लँडिंग केलं. सध्या लँडर मॉड्युलमधील विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोव्हरकडून चंद्रावर जोरात संशोधन कार्य सुरु आहे. लँडर आणि रोव्हरने चंद्रावर अनेक गोष्टी शोधून काढल्या आहेत.



## भाजपा महिला मोर्चाच्या वतीने रक्षाबंधन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** रक्षाबंधननिमित्त सुधीर मुनगंटीवार पालकमंत्री, चंद्रपूर, महिला मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष, वणाती अक्का, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चीत्राताई वाघ यांचे मार्गदर्शनात आणि अंजली घोटेकर, जिल्हाध्यक्षा भाजपा महिला मोर्चा महानगर चंद्रपूर यांचे नेतृत्वात रक्षाबंधन कार्यक्रम रामनगर पोलिस स्टेशन, चंद्रपूर येथे तसेच अटो ड्रायव्हर यांना राखी बांधून कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी बोलताना अंजली घोटेकर म्हणाल्या की आज भाऊ बहिणीच्या पवित्र प्रेमाचा, अनोख्या बंधनाचा सण आहे. या दिवशी बहीण भावाच्या हातावर प्रेमाने रक्षासूत्र बांधून जीवनभर आपले रक्षण करण्याचे वचन घेते.आज पोलिस अधिकारी ठाणेदार मुले साहेब आणि सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांचे हातावर गायत्री मंत्राच्या जय घोषात रक्षासुत्र बंधू त्यांच्याकडून सर्व बहिणीचे, पीडित बहिणींचे रक्षण करण्याची ताकत त्यांना मिळो आणि त्यांना दीर्घायुष्या मिळोअशी सदिच्छा व्यक्त केली. ठाणेदार मुळे सहेबानिही सर्व प्रती आदर व्यक्त करून धन्यवाद दिले.यानंतर ऑटो ड्रायव्हर्स ल ही रक्षासुत्र बांधून त्यांचे पेढे आणि नाष्टा देऊन त्यांचे स्वागत करण्यात आलेयावेळी शीला चव्हाण,चंद्रकला सोयाम, सविता कांबळे, रेणू घोडेस्वार मोनीशा महतो, लीलावती रविदास, पुष्पा उरदे, सिंधू राजगुरे, वंदना जांभूळकर वंदना संतोषवार, कल्पना बहुलकर वर्षा सामोलकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## पळसखेड येथे तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी माणिकराव खरात बिनविरोध



आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यातील पळसखेड येथील तंटामुक्त समितीच्या अध्यक्षांची अविरोध निवड करण्यात आली आहे. संभाजी ब्रिगेडचे अर्जुन पाटील खरात यांनी आपला अर्ज मागे घेऊन सामजिक बांधिलकीचा एक नवा पायंडा घालून दिला आहे.

गावातली भांडण तंटे गावातच मिटावे आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या पोलीस कारवाई, कोर्टकचेरीच्या फेऱ्या पासून ग्रामस्थांना दिलासा मिळावा व गावातली सामाजिक सलोखा कायम रहावा या उद्देशाने शासनाने महत्त्वपूर्ण महात्मा गांधी तंटामुक्ती योजना गावपातळीवर सुरू केली आहे. त्या अनुषंगाने पळसखेड येथील तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी माणिकराव खरात यांची अविरोध निवड करण्यात आली आहे. येथील संभाजी ब्रिगेडचे आर्जुन पाटील खरात यांनी आपला अर्ज मागे घेऊन सामोपचाराने अध्यक्ष पदाची माळ माणिकराव खरात यांच्या गळ्यात घातली आहे. परिणामी गावातील खेळीमेळीचे राजकीय वातावरण अबाधित राखण्यासाठी आर्जुन पाटील यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांसमोर एक चांगला आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या या निर्णयाचे गावकऱ्यांसह, संपुर्ण तालुक्यातून स्वागत होत आहे.

यावेळी उपाध्यक्ष म्हणून, भारत बाजीराव खरात यांची नियुक्ती करण्यात आली असून, समितीचे सदस्यामध्ये प्रकाश गर्जे, देवानंद मोरे, प्रभाकर गुंजकर, अनिल खरात, सुदामा फड, यांचा समावेश करण्यात आला आहे.

सदर ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच गौतम शिरसाठ होते, तर गावातील प्रतिष्ठित व्यक्ती बाजार समितीचे माजी सभापती बाळासाहेब खरात, माजी संचालक आंबादास खरात, खुशालराव खरात, पुंजाजी पाटील, अंबर खरात, ज्ञानेश्वर खरात, देवराव खरात, विठ्ठल खरात, गणेश खरात, सिताराम गिरे, आश्रुजी खानझोडे, ज्ञानेश्वर गव्हाणे, बालाजी खानझोडे व बहूसंख्य ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## मंत्रालय परिसरात अचानक दगडांचा वर्षाव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गुरुवारी मंत्रालय परिसरात अचानक दगडांचा वर्षाव सुरू झाला. यामुळे मंत्रालय इमारत आणि आजूबाजूच्या इमारतींच्या खिडक्यांच्या काचांना तडे केले तर काही काचा फुटल्या. या घटनेमुळे मंत्रालय परिसरात अचानक भीतीचे वातावरण तयार झाले होते. मेट्रोच्या सबवेच्या कामासाठी करण्यात आलेल्या ब्लास्टमुळे मोठ्या प्रमाणात दगड उडाले आणि मंत्रालय इमारत तसेच परिसरातील अन्य इमारतींच्या दिशेने उडत आले. यामुळे मंत्रालयाच्या तसेच या परिसरातील अन्य इमारतींच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या इतक नाही तर मंत्रालयातील अनेक गाड्यांचे देखील नुकसान झाले. या परिसराती अनेक गाड्यांच्या काचा फुटल्या होत्या. मंत्री मुनगंटीवार यांच्या कार्यालयाचे देखील नुकसान झाले.

## ट्रम्प यांचा दावा

आधुनिक केसरी

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची सध्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी उलटतपासणी चालू आहे. या तपासणीदरम्यान डोनाल्ड ट्रम्प यांनी न्यूयॉर्कच्या अॅटर्नी जनरलच्या प्रश्नांना उत्तरं देताना अनेक दावे केले आहेत. त्यात त्यांनी कोणताही आर्थिक गैरव्यवहार केला नसल्याचा दावा केला आहे. मात्र, त्याहून मोठा दावा ट्रम्प यांनी आण्विक युद्धासंदर्भातला केला आहे. मी जगाला अण्वस्त्रयुद्धापासून वाचवलं आहे, असं ट्रम्प आपल्या जबाबात म्हणाले आहेत. एप्रिल महिन्यात झालेल्या या तपासणीची कागदपत्रे आता समोर आली आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांचा जबाब तब्बल ४७९ पानांचा झाला आहे. ऑक्टोबर महिन्यात या प्रकरणाची सविस्तर सुनावणी होणार असून त्या दृष्टीने हा जबाब महत्त्वाचा मानला जात आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी काही वर्षी आपली संपत्ती जवळपास ३९ टक्क्यांनी जास्त दाखवल्याचा दावा याचिकाकर्त्यांच्या वकिलांकडून करण्यात आला आहे. मात्र, त्याला विरोध करताना तुम्ही हे प्रकरण रद्दबातल करायला हवे, अशी भूमिका ट्रम्प यांनी मांडली. मला स्वत: माझी बाजू मांडण्यासाठी इथे यावे लागले ही लाजिरवाणी बाब आहे, असेही ट्रम्प म्हणाले होते. मिंटने एपी न्यूजच्या हवाल्याने हे वृत्त दिलं आहे. दरम्यान, आपल्या जबाबात ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष असताना कोणती महत्त्वाची कामे आपण केली, याचा पाढाच वाचला आहे. राष्ट्राध्यक्षपद सांभाळणे ही सर्वात महत्त्वाची जबाबदारी आहे. चीनसंदर्भातली अमेरिकेची भूमिका. रशिया युक्रेनमध्ये घुसखोरी करणार नाही याची काळजी घेणे आणि उत्तर कोरियाचा हुकुमशाह किम जोंग उनला अण्वस्त्र डागण्यापासून परावृत्त करणे अशा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मी पार पाडल्या, असे ट्रम्प आपल्या जबाबात म्हणाले आहेत. मला वाटते जर मी उत्तर कोरियाशी चर्चा केली नसती, तर तुम्हाला अण्वस्त्रयुद्धाचे चटके सोसावे लागले असते. जर राष्ट्राध्यक्ष म्हणून माझी निवड झाली नसती, तर अण्वस्त्रयुद्ध झाले असते. मला तर वाटते की अजूनही जग अण्वस्त्रयुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे, असा गंभीर दावा डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे.

## धर्मावरुन भांडणे बरे नाही ?



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**धर्म.......देशात असे बरेच धर्म आहेत की बऱ्याचशा सर्व धर्मांची तत्वं मिळती जुळती आहेत. फरक पाहता थोडासाच फरक आहे परंतु माणसागणिक आज धर्म आहे व ज्यांचा ज्यांचा जसा धर्म आहे. ती ती माणसं आपल्या आपल्या धर्माची महकता सांगत असतात. धर्म यासाठी प्रसवला जातो की काही लोकांना ते ज्या धर्मात असतात. त्या धर्माचे विचार पटत नाहीत. त्यांना आपल्याच विचारांचा धर्म हवा असतो. त्यामुळंच ते आपलाच धर्म प्रसवत असतात. सर्व धर्म सारखे असतात का? होय, सर्वच धर्म सारखेच असतात किंवा सर्व धर्मातील तत्व वा सार मिळतेजुळते असतात. जसे. चोरी करु नये. दारु पिवू नये. व्याभीचार करु नये. हिंसा करु नये. स्त्रीयांचा सन्मान करावा वा राखावा. वैगेरे वैगेरे.**

कोणताही धर्म हा चोरी करायला सांगत नाही वा कोणताही धर्म हा दारु प्यायला सांगत नाही. तसाच कोणताही धर्म हा प्राणीमात्राची हिंसा वा कोणत्याही प्रकारची हिंसा करायला सांगत नाही वा कोणताही धर्म हा कोणत्याही स्त्रीची अब्रू लुटायलाही सांगत नाही. असा असतांना आज संबंधीत सर्व लोकांना पाहिलं तर ते पछाडलेलेच दिसतात. कोणी दारुनं पछाडलेले असतात तर कोणी व्याभीचारानं. कोणी हिंसावृत्तीनं पछाडलेले असतात तर कोणी निंदेनं. अन् हे जेव्हा बाकी लोकांना सहन होत नाही, तेव्हा ते आपला आपला धर्म इथं मांडतात. परंतु तो मांडल्यावर ज्या व्यक्तीनं तो धर्म मांडला वा अंगीकारला. तो तरी सत्धर्मानं तो धर्म ज्यासाठी मांडला, त्याची तत्व पाळतात का? तर याचं उत्तर नाही असंच देता येईल. एक उदाहरण देतो. अशाच एका व्यक्तीचं उदाहरण. त्या व्यक्तीची दुसऱ्या एका व्यक्तीसोबत चर्चा चालली होती. तो म्हणत होता. "मी बुद्धिस्ट."त्यानं ज्याला तसं सांगीतलं. त्याला ते समजलं नसल्यानं त्यानं पुन्हा प्रश्न केला. "बुद्धिस्ट म्हणजे?" "बुद्धिस्ट म्हणजे बौद्ध." "केव्हापासून झालात? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्विकारला, तेव्हापासूनच आम्ही बौद्ध झालोय आणि सर्वांनी बौद्ध व्हायला हवं. आता ते ऐकणारा व्यक्ती बौद्ध नसेल कदाचीत. त्याला त्या व्यक्तीच्या बोलण्याचा राग आला. कारण त्याला प्रत्येकांनी बौद्ध व्हावं असं म्हटलं होतं व ते त्याला कदाचीत पटलं नसेलच. ते त्याच्या चेहऱ्यावरुन स्पष्ट जाणवत होतं. तसा तो म्हणाला, का बनलात बौद्ध? अर्थात बौद्ध धर्म का स्विकारला? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्विकारला म्हणून. त्यांनी का स्विकारला धम्म? जरा सांगाल का? समाजावर सनातन्यांचे अत्याचार होत होते म्हणून. मग संपले काय अत्याचार? आता नाही होत काय?

होतात. मग आता बदलवाल काय धम्म? तो व्यक्ती गडबडला. काय उत्तर द्यावं ते कळत नसेल त्याला.

तसा तो म्हणाला, तुम्हाला माहीत नसेल की मनुस्मृतीनं किती अत्याचार केले अस्पृश्यांवर. त्याचा अभ्यास नसेल तुमचा. त्यात कलमा किती वाईट वाईट लिहिल्या आहेत. का लिहिल्या आहेत याचा विचार केला काय?

या प्रश्नांवरही तो गडबडला व तो चूप बसून शांतपणे निघून गेला. कारण अपुर्ण अभ्यास. अभ्यास जर असता तर तो व्यक्ती चूप बसून शांतपणे निघूनच गेला नसता. मनुस्मृती लिहिली गेली व त्यात कलमा टाकल्या गेल्या. त्यानुसार प्रत्येक स्त्री व प्रत्येक अस्पृश्यांना निर्वाणीचं जगणं जगावं लागलं. मनुस्मृती त्यासाठीच लिहिल्या गेली असेल अन् लागूही केली असेल की हा त्या काळातील शूरवीर असलेला अस्पृश्य समाज तशीच त्या काळातील शूरवीर असलेला स्त्री वर्ग चूप बसायला हवा. कारण त्यावेळेस अस्तीत्वात असलेला अस्पृश्य समाज हा राजा होता. राजपरीवारातील होता. काटक होता व शुरवीर होता. अशा लोकांवर सहज विजय मिळवता येणं शक्य नव्हतं. युद्धात तर त्यांना जिंकणं शक्यच नव्हतं. त्यामुळंच त्यांच्यावर सहजपणं विजय मिळविण्यासाठी व त्यांना मांडलीक वा गुलाम बनविण्यासाठी मनुस्मृती लिहिली गेली असावी ही सत्य बाब आहे. तसाच त्या काळातील स्त्री वर्गही शुरवीर होता. तो शास्त्रार्थात पुरुषांना हारत नव्हता. अशाच स्त्रियांनाही गुलाम बनविण्यासाठी मनुस्मृतीची आखणी केली गेली. आज हाच अस्पृश्य समाज आपलं अस्तित्व विसरला आहे. आपलं राजेपण विसरला आहे. तशीच ती स्त्रिही आपलं अस्तित्व विसरली आहे. आपला शास्त्रार्थ विसरली आहे. आपलं अस्तित्व विसरली आहे की मी पुरुषांसोबत शास्त्रार्थ करुन त्यांचा पराभव करीत होती. मनुस्मृती वाईट असो की नसो. परंतु आज आपण स्वतंत्र भारतात राहतो. स्वतंत्रपणे गोष्टी करतो. आपली वेगळी अशी स्वतंत्र नियमावली आहे. जी नियमावली संविधान म्हणून लिहिल्या गेली आहे. असं म्हणता येईल. मग असं असतांना आजही अस्पृश्यच नाही तर स्त्रीवरही अत्याचार का होतात? कारण आजही देशात संविधान जरी असलं आणि ते सक्षम जरी असलं तरी दळभद्री लोकंही आज देशात आहेत. त्यामुळंच अत्याचार होत असतात आणि अत्याचार होतच राहणार. कारण कितीही संविधान लिहिले गेले आणि कितीही त्या संविधानांना सक्षम केलं गेलं तरी जेव्हापर्यंत हे दळभद्री लोकं समाजात आहेत. तेव्हापर्यंत हे चालतच राहणार. मग धर्म कितीही बदलवला वा कितीतरी वेळा संविधान लिहिलं वा कितीतरी वेळेस संविधानाला सक्षम बनवलं, तरी हे असले अत्याचार चालतच राहतील.



महत्वपुर्ण गोष्ट ही की अशाच दळभद्री लोकांमुळेच, ते विचार न पटल्यानं त्या त्या काळात धर्माची स्थापना केली गेली व धर्म प्रसवला गेला. त्यानंतर काही काही लोकांनी त्यांच्या धर्मात हिंसा सांगीतली नसतांनाही हिंसा आणली. बकरे खा. कोंबडे खा. देवाला नवस म्हणून कोंबडे, बकरे कापा. थोडं थोडं नैवेद्य म्हणून द्या. दारु पिणंही आणलं. थोडी थोडी दारु प्रसाद म्हणून द्या. बुरखाही आणला. हे का आणलं? त्याचं कारण होतं तेथील वातावरण व तापमान. त्या तापमानानुसार उष्णतामानापासून बचाव करण्यासाठी बुरखा आणला. तसंच बर्फाळ प्रदेशात शरीरातील अवयव या बर्फात राखता यावं, म्हणून हिंसा आणली. तशीच दारुही आणली. विशेष सांगायचं म्हणजे दारु प्रसाद म्हणून पिणे, वा बकरा, कोंबडा देवासाठी नवश म्हणून कापणे वा बुरखापद्धती हे कोणत्याही धर्मात सांगीतले नसेलच. परंतु समाजात जे दळभद्री लोकं आहेत. त्यांच्याकडून धर्म अशा रितीनं प्रसवल्या गेला. त्या धर्मात तद्नंतर तशी कलमं टाकण्यात आली. जशी कलमं मनुस्मृतीत लिहिली गेली. आज समाजात असे अनेक धर्म आहेत. हिंदू, मुस्लिम, शिख, ईसाई, बौद्ध व जैन हे प्रमुख धर्म आहेत. त्यानंतर वारकरी, परमात्मा, नाथजोगी, यहुदी असे इतरही बरेच धर्म आहेत की जे माणसांनाच नाही तर प्राणीमात्रांनाही जगायला लावतात. जगण्याचे विचार प्रसवतात. जे स्त्रियांना उपभोग्य वस्तू मानत नाहीत. जे दारु प्यायला सांगत नाहीत आणि जो धर्म असे करायला सांगतात वा तसे विचार प्रसवतात. त्याला आपण धर्मही मानू नये. खरं सुख धर्म निर्माण करण्यात वा दुसऱ्या धर्मात जाण्यात नसून आपली विचार शक्ती सुधरविण्यात आहे. आपली विचारशक्ती जर चांगली असेल तर आपल्याला प्रत्येक धर्मात चांगलेच दिसणार. जर ती विचार शक्ती चांगली नसेल तर आपण कोणत्याही धर्माचा स्विकार केला तरी आपल्याला चांगले गवसणार नाही. कारण प्रत्येकच धर्मात दळभद्री लोकं असतातच हे शंभर प्रतिशत खरं आहे.

महत्वाचं सांगायचं झाल्यास प्रत्येकच धर्म हे चांगलेच असतात. वाईट कोणतेच धर्म नसतात आणि कोणीही कोणत्याही धर्माला वाईट म्हणू नये व कोणीही धर्माच्या नावावर भांडणं करु नये वा धर्मावर टिका करु नये. कोणी जर धर्मावरुन टिका केली तर त्यातूनच भांडणं वाढतात. ते भांडणं एवढे विकोपाला जातात की त्यातून आपलंच नाही तर देशाचंही नुकसान होतं. जे नुकसान कधीच भरुन निघणारं नसतं. म्हणूनच धर्मावर टिका करण्यापुर्वी सावधान राहायला हवं व हे लक्षात ठेवायला हवं की आपण जर एक बोट दुसऱ्यांना दाखवलं तरी चार बोटं आपल्याकडेच असतात.

## इच्छा भौतिक नाही तर आध्यात्मिक असल्या पाहिजेत



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**इच्छा म्हणजे दुःखांचा मुळ आणि हे मुळ कायमस्वरूपी नष्ट करण्यासाठी आपल्या मनात निर्माण होणाऱ्या इच्छा ह्या भौतिक नाही तर आध्यत्मिक असल्या पाहिजेत.संसार हा क्षणभंगुर असुन भौतिक सुख सुविधा हे मृगजळ आहे. त्या मागे आपण इच्छा स्वरूप धावत असतो . धावुन धावुन धकलो तरी हा मार्ग संपत नाही. हा कधीच न संपुष्टात येणारा मार्ग असल्याने जीवनाचं सार्थक होण्यासाठी भौतिक नाही तर आध्यत्मिक इच्छा बाळगाल्या पाहिजेत.**

संसारातील भौतिक इच्छा आध्यत्मिक ज्ञान मार्गाने पुर्ण करता आल्या तर जीवनात दुःखांचा लवलेशही उरत नाही. पण आपल्याला भौतिक इच्छा आध्यत्मिक इच्छा मध्ये परिवर्तित करता येत नाहीत म्हणून खरी अडचण निर्माण होते. संसार म्हटलं की अनंत इच्छा असतात पण त्या इच्छा पुर्ण होण्यासाठी मर्यादा देखिल असतात. किती हि मिळवलं तरी जीवनास पुर्णत्व मिळत नाही समुद्राला अंत नसतो तसंच इच्छांना देखिल अंत नसतो इच्छा असणं गैर नाही. संसारात इच्छा निर्माण होणारच या मध्ये अजिबात शंका नाही. पण इच्छा निर्माण होताना इच्छा भौतिक आधारावर नाही तर आध्यत्मिक आधारावर आधारीत असल्या पाहिजेत. जेणेकरून इच्छापूर्ती अपुर्तीच दुःख अथवा खेद कलेष आपल्याला अजिबात होणार नाही. जीवनात दुःखांचा सामना करायची इच्छा नसेल तर जीवनात इच्छा बाळगायला हरकत नाही पण आपली प्रत्येक इच्छा ही आध्यत्मिक ज्ञानाशी सुसंगत असली पाहिजे. म्हणजे दुःख आपला प्रभाव आपल्यावर निर्माण करू शकणार नाही. आपलं जीवन दुःख मुक्त असाव हे प्रत्येकाला वाटत असत. पण त्यासाठी भौतिक नाही तर अध्यात्मिक इच्छा बाळगल्या



पाहिजेत. इच्छा म्हणजे, आशा, अपेक्षा, महत्वकांक्षा, तृष्णा, वासना, भावना, ह्या वेळ आणि काळानुरूप वेगवेगळ्या असतात. बालपणी वेगळ्या तारूण्यात वेगळया आणि वयोवृद्ध अवस्थेतील वेगळ्या अशा पद्धतीने वेळेनुरूप इच्छा बदलतं असतात. एकंदरीत काय तर जसं वय वाढेल तसं इच्छा बदलतं असतात.पण जीवनातील प्रत्येक इच्छा ही भौतिक नाही तर आध्यत्मिक असेल तर सर्व दुःखापासून आपली आपोआप मुक्ति होईल. जीवन म्हणजे इच्छांचा समुद्रच असतो. अनंत इच्छांच ओझं घेऊन आपण जीवन जगत असतो. बहुतांश इच्छा पुर्ण होत नाहीत हे वास्तव पचवता येत नाही म्हणून जीवनात दुःखाची निर्मिती होत असते. जीवनात इच्छा असणं गैर नाही पण इच्छा भौतिक नाही तर अध्यात्मिक असल्या पाहिजेत. जन्म ते मृत्यू हा फक्त इच्छांचा सापळा असतो. या सापळ्यात मृगजळात आपण अलगद अडकतो आणि संबंध जीवन हे फक्त दुःख मय ठरत. जीवन आणि इच्छा यांचा परस्परसंबंध घनिष्ठ असतो. अनेक इच्छा उत्पन्न होऊन त्या पुर्ण करण्यासाठी जीव अहोरात्र धडपडत असतो. पण भौतिक इच्छा या मध्ये फार काही साध्य होत नाही शेवटी पदरी दुःख पडत. अध्यात्मिक इच्छा ह्या ज्ञान सदृश असतात. त्याची कल्पना, संकल्पना तृप्ती ह्या सर्व बाबी ज्ञानाशी संबंधित असल्याने या इच्छा दुःख नाही तर आनंद निर्माण करत असता. संसारात सगळं काही अस्थिर अस्थायी असतं आणि अस्थायी बाबींसाठी आपण नाहक दुःख निर्माण करतो. जीवनाचा मुख्य उद्देश आणि अर्थ समजला तर आपण निरर्थक बाबींवर लक्ष्य केंद्रित करत नाही महत्वाचा आणि आत्मा हितार्थ काय आहे यावरच लक्ष्य केंद्रित करतो. आत्मा हितार्थ बाबी ह्या चिरकाल टिकणारया असता. पण आपण जो कायम स्वरुपी टिकणार आहे ते स्वीकारण्यास तयार नसतो आणि जे क्षणिक आहे संपुष्टात येणार आहे ते मिळविण्यासाठी उतावीळ असतो. पण आयुष्य अंतिम टप्प्यात असताना सत्य समजत पण उपयोग होत नाही म्हणून जितक्या लवकर जागृत होता येईल तितक्या लवकर जागृत होता आलं पाहिजे. इच्छा भौतिक बाळगुन दुःख अर्जित करण्या ऐवजी आध्यत्मिक इच्छा बाळगून दुःख मुक्त जीवन जगणं कधीही उत्तम आणि हितकारक आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पत्रकारांना संरक्षण देण्यासाठी कठोर कायदे करावे

## पद्मभूषण अण्णा हजारे : राळेगण सिद्धी येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पारनेरच्या वतीने गुणवंतांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**पारनेर :** पत्रकार हासुध्दा एक समाजसेवक आहे. तो समाज मनाचा आरसा असून, आज पत्रकारांवरच हल्ले होताना दिसत आहेत. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर असे हल्ले होत असतील तर हा देश हे राज्य सुरक्षित कसे राहणार.. असा सवाल अण्णा हजारे यांनी केला. लोकशाहीचा चौथा स्तंभ जर सुरक्षित असेल तरच लोकशाही सुरक्षित राहील. पत्रकारांना संरक्षण देण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने विधीमंडळ तसेच संसदेत कठोर कायदे संमत करुण घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांनी व्यक्त केले आहे. राळेगण सिद्धी येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पारनेर यांचे वतीने समाजातील विविध गुणवंतांचा सन्मान,पत्रकारांना रेनकोटवाटप व ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले यावेळी जेष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे बोलत होते. यावेळी पद्मभूषण अण्णासाहेब हजारे तसेच राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सचिव डॉ.विश्वासराव आरोटे यांचे अध्यक्षतेखाली सर्व पत्रकार बांधवांना रेनकोट तसेच ओळखपत्र व एक वृक्षभेट देण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन, राज्य पत्रकार संघाचे अहमदनगर जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते,राज्य पत्रकार संघाचे अहमदनगर जिल्हा सचिव व शिवसंवाद न्युजचे संपादक गाडगे उपस्थित होते. पद्मभूषण अण्णासाहेब हजारे, डॉ.विश्वासराव आरोटे, दत्ता पाचपुते व दत्ता गाडगे आदी मान्यवरांचे उपस्थितीमधे प्राथमिक शिक्षक आनंदा झरेकर, तुकाराम आडसुळ, पीएसआय ( केंद्रिय पोलीस दल) तुषार ढवण, लोकशाहीर दत्ता करंदीकर, नुतन चौधरी मुंबई पोलीस, लोककलावंत मनिषा चव्हाण आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मानचिन्ह तसेच शाल, श्रीफळ, बुके देउन सन्मानित करण्यात आले. हजारे यावेळी म्हणाले राज्य पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष वसंत मुंढे, मुख्य संघटक संजयजी भोकरे, सचिव डॉ. विश्वासराव आरोटे यांनी राज्यातील ग्रामीण भागातील पत्रकारांना संघटीत करत अनेक सामाजिक उपक्रम राबवून पत्रकारांना न्याय देण्याचे पवित्र कार्य केले. झोपलेल्या सरकारला नेहमी जागे राहण्यास भाग पाडले. पत्रकारीता करत असताना नियमीत सेवाभाव जपण्याचे काम केले आहे. राज्यातील ग्रामिण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर पत्रकारांवर



हल्ले होत आहेत. झोपलेल्या सरकारला हे कधी कळणार..? लोकशाहीचा चौथा स्तंभ धोक्यात आल्यामुळे लोकशाहीवरच हा हल्ला असुन, सरकारने या गोष्टीकडे गांभीर्याने पहायला हवे. यासाठी राज्य व केंद्र सरकारने विधीमंडळ आणी संसदेत पत्रकारांना संरक्षण देण्यासाठी कठोर कायद्याची निर्मीती करावी अशी मागणी अण्णा हजारे यांनी सरकारला केली. यावेळी बोलताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सचिव डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले,अण्णांनी माहीतीचा अधिकार हि देशाला दिलेली देणगी आहे.पत्रकारांना संरक्षण मिळणे गरजेचे आहे.अण्णांनी समाजाला न्याय देण्यासाठी अनेक यशस्वी आंदोलने केली. अण्णा हे देशाचे प्रति गांधीजी आहेत. पत्रकारांना संरक्षण मिळावे यासाठी सरकारने कठोर कायदे करावेत अशी सुचना केंद्र व राज्य सरकारला देण्याची गरज असल्याची मागणी आरोटे यांनी केली. पत्रकार बांधवांना रेनकोट वाटप करताच वरुण राजाचे आगमण झाल्याने सर्वच आनंदी झाले. पत्रकार बांधवां साठी जेष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांनी प्रथमच मोठा वेळ दिला. याप्रसंगी राज्य पत्रकार संघाचे श्रीगोंदा तालुका तालुकाध्यक्ष शिंदे, सचिव पिटर, पारनेर तालुका उपाध्यक्ष सुरेश खोसेपाटील, रामदास नरड, अविनाश भांबरे, खजिनदार संतोष कोरडे,पारनेर शहराध्यक्ष संतोष तांबे,निघोज शहराध्यक्ष सागर आतकर, मायभूमीचे कार्यकारी संपादक महेश शिंगोटे,पत्रकार वसंत रांधवन, संपत कपाळे, गंगा धावडे, आनंदा भुकन, संपत वैरागर, संदीप गाडे, अनिल चौधरी, भगवान मंदिलकर, नितीन परंडवाल, सचिन जाधव आदींसह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने हजर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना तालुकाध्यक्ष विनोद गायकवाड यांनी संघटनेच्या कार्याचा धावता आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्याध्यक्ष संजय मोरे यांनी तर, आभार सचिव बाबाजी वाघमारे यांनी आभार मानले.



## पायली-चिंचोली येथील ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती करा : उलगुलानचे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** तालुक्यातील पायली-चिंचोली येथील महावितरणचे ट्रान्सफॉर्मर मागील अनेक दिवसांपासून बंद आहे.त्यामुळं शेतकऱ्यांना शेतपिकांना पाणी देण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागत असून ट्रान्सफॉर्मर तात्काळ दुरुस्ती करा अशी मागणी उलगुलान संघटनेच्या वतीने करण्यात आली असून शेतकऱ्यांना सोबत घेऊन मूल रोड येथील कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. गोपाळा उपरे यांच्या शेताजवळ महावितरणचे ट्रान्सफॉर्मर आहे.परिसरातील शेतकऱ्यांना शेतीचे काम करणे सोयीचे व्हावे म्हणून हे ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले. मात्र अनेक दिवसांपासून हे ट्रान्सफॉर्मर बंद अवस्थेत आहे. परिणामी शेतपिकांना पाणी देण्यास अडचण निर्माण होत असून शेतपिकांचे नुकसान होत आहे. त्यामुळं शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.


याबाबत महावितरणला वारंवार निवेदन दिले. मात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले. याची माहिती उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांना मिळताच त्यांनी तात्काळ कार्यकारी अभियंत्यांची भेट घेऊन चर्चा केली व निवेदन दिले.

शेतकऱ्यांचे होणारे नुकसान बघता तात्काळ ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती करावी अशी मागणी उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे व शेतकऱ्यांनी केली आहे. यावेळी राजु झोडे, नदीम रायपूरे, सागर कातकर, गोलू धोपटे आदि शेतकरी उपस्थित होते.

## 'एस-क्वेस्ट' परीक्षेत उत्कृष्ट रँकिंग; शुभमची सिंगापूरसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** स्वान रिसर्च ॲण्ड सोशल स्टडी फाऊंडेशन यांनी नासा ट्रेनिंग प्रोग्राम अंतर्गत आयोजित केलेल्या 'एस-क्वेस्ट' परीक्षेत उत्कृष्ट रँकिंग मिळवल्याने पैठण येथील प्रिंटिंग व्यवसायीक असलेले सचिन उंडाळे यांच्या मुलाची शुभम उंडाळेची सायन्स सेंटर, सिंगापूर येथे जाण्यासाठी निवड झाल्याबद्दल सर्वच स्तरावर शुभमचे अभिनंदन होत आहे. आज संपूर्ण जग विकासाची वाट चालत आहे. विकासाच्या व तंत्रज्ञानाच्या



आधारे माणूस केवळ पृथ्वीपूरताच मर्यादित राहिला नाही, तर अवकाशातही प्रवास करू लागला आहे. चंद्र, मंगळ हे ग्रह तर मानवाच्या अगदी ओळखीचे झाले आहेत. अंतराळासंबंधित प्रयोग, अभ्यास आणि संशोधन हे प्रत्येक देश स्वतःच्या पद्धतीने करत असतो. संबंधित संशोधनासाठी अनेक देशांनी स्वतःची अंतराळ संस्था तयार केली आहे. विद्यार्थ्यांना शालेय स्तरावरच खगोलशास्त्रात रुची निर्माण व्हावी आणि या माध्यमातून प्रात्यक्षिक दाखविणे हा मुख्य उद्देश आहे. या सेंटरमध्ये ट्रेनिंग प्रोग्रामसाठी स्वान रिसर्च अँड सोशल स्टडी फाऊंडेशन वतीने भारतामध्ये पहिल्यांदाच ट्रेनिंग प्रोग्रामच्या निवडीसाठी महाराष्ट्रामध्ये इ. ६ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी परिक्षा घेण्यात आली. यात शुभम ने बाजी मारत सिंगापूरला जाण्यासाठी निवड झाली असुन येत्या २ सप्टेंबर रोजी पुणे येथे शुभम उंडाळे चा सत्कार होणार आहे.

## पालिकेच्या वतीने नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी


आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** नगर पालिकेच्या वतीने शहरातील १८ दिव्यांग व्यक्ती व २८अंगणवाडी सेविका अशा ऐकून ४२व्यक्तींची मोफत संपूर्ण आरोग्य तपासणी व रक्त तपासणी मंगळवारी पालिकेच्या भगवान महावीर रुग्णालयात आयोजित मोफत दिव्यांग रुग्ण तपासणी शिबिरात करण्यात आली. या शिबीराचे उदघाटन व धनवंतरी पूजन जिल्हा आरोग्य समिती सदस्य धोंडीरामसिंह राजपूत व उपमुख्यधिकारी राहुल साठे यांनी केले, वैद्यकीय अधिकारी डॉ. सविता निकाळे यांनी आजार रुग्णांना योग्य गोळ्या औषधी घेण्याचा व उपचार घेण्याचा सल्ला देण्यात आला. त्यांना नर्सेसेस निर्मला जाधव, सौ. सिरसाट यांनी व सहायक अशोक गाडेकर यांनी सहकार्य केले. धोंडीराम राजपूत यांनी दिव्यांग रुग्ण व अंगणवाडी सेविकांना आरोग्य काळजी घेण्याचा सल्ला दिला.




महाराष्ट्र Business Katta









# शासकीय अधिकारी लाचलुचपतीच्या विळख्यात



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**शासकीय कार्यालयातील अधिकारी लाचलुचपतच्या जाळ्यात अडकत असून भ्रष्टाचार मुक्त अभियानाला खीळ बसत आहे. शासकीय कार्यालयातील अधिकारी,कारकून व शिपाई सर्रास लाच घेऊनच काम करतात.दक्षिणा चढविल्याशिवाय फाईल पुढं सरकारच नसते.है वास्तव आहे.नाशिकमध्ये एका महिला अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहात पकडल्याची घडना समोर आलेली. संबंधित प्रकरण राज्यभरात गाजलं होतं. पण तरीही काही अधिकारी या घटनांमधून काहीच बोध घेताना दिसत नाहीय. भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांकडून अजूनही लाच मागण्याचे प्रकार समोर येत आहेत. नाशिकमध्ये पुन्हा तसाच प्रकार समोर आला आहे. एका महिला शिक्षण अधिकाऱ्याने एका सस्पेंड मुख्याध्यापकाकडे पत्र पाठवण्यासाठी तब्बल ५० हजार रुपयांची लाच मागितली. त्यामुळे संबंधित शिक्षण अधिकारी एसीबीच्या जाळ्यात अडकली आहे. एसीबीने सापळा रचत या महिला अधिकाऱ्याला बेड्या ठोकल्या आहेत.**

हे प्रकरण ताजे असतानाच पुण्यातील महसूल विभागाचे लाचखोर अधिकारी, अतिरिक्त विभागीय आयुक्त डॉ. अनिल रामोड यांना सिबिआयने ८लाख रुपयांची लाच घेतांना अटक केली असून रामोड यांना अखेर निलंबन करण्यात आले आहे. . ८ लाख रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी डॉ. रामोड यांना ९ जून रोजी सीबीआयने अटक केली होती. यवतमाळ जिल्ह्यातील एका महिला अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहाथ पकल्याने यवतमाळ जिल्ह्यात खळबळ निर्माण झाली आहे.रास्त भाव धान्य दुकानाच्या प्राधिकार पत्रावर वारस म्हणून नावाची नोंद घेण्यासाठी लवकर अहवाल सादर करण्याकरीता दहा हजार रुपयांची लाच स्वीकारताना पुरवठा विभागाच्या महिला अधिकाऱ्याला रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई अमरावती एसीबी पथकाने यवतमाळ तहसिल कार्यालयात बुधवार, २४ मे रोजी पार पाडली. चांदणी शेषराव शिवरकर ( ३२ ) असे तहसिल कार्यालयातील लाच स्वीकारणाऱ्या निरीक्षण अधिकारी महिलेचे नाव आहे. 'भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र'च्या वल्गना होत असतानाच दुसरीकडे जुलै २०२२ ते ६ जून २०२३ या काळात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तब्बल एक हजार ३८ जणांविरुद्ध तर जानेवारी २०२१ ते ३० जून २०२२ या काळात एक हजार ६३३ जणांविरूद्ध लाचखोरीची कारवाई केली आहे. त्यात नेहमीप्रमाणे महसूल व पोलिस विभागच पुढे असून 'क्लास वन व टू'चे १८९ अधिकारी त्यात आहेत. बहुतेक शासकीय विभागांमध्ये 'टेबलावर वजन ठेवल्याशिवाय कामच होत नाही' अशी स्थिती असल्याचे या कारवायातून स्पष्ट होते.

भ्रष्टाचार आणि शेतकरी आत्महत्या हे महाराष्ट्रातील प्रमुख समस्या आहेत. केंद्रात सत्तांतर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'भ्रष्टाचारमुक्त भारत'ची घोषणा केली. त्यानुसार अनेक राज्यांनी त्यादृष्टिने खबरदारी घेतली. पण, दबलेल्यांचा आवाज होणाऱ्या विभागांमधील लाचखोर अधिकारी-कर्मचारीच त्यांच्याकडे लाचेची मागणी करून मुस्कटदाबी करीत आहेत.महसूल, शिक्षण, पोलिस व महापालिका, नगरपरिषद,



पंचायत समिती, जिल्हा परिषदेत असे प्रकार सर्रासपणे सुरु असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या मागील ११ महिन्यातील कारवाईतून स्पष्ट होते. तत्पूर्वी, जानेवारी २०२१ ते जून २०२२ या काळात देखील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एक हजार १५९ ठिकाणी सापळे रचून एक हजार ६३३ जणांना रंगेहाथ पकडले होते. जुलै २०२२ ते ५ जून २०२३ या काळात देखील राज्यातील ७२५ सापळ्यात एक हजार ३८ जण सापडले आहेत.२८७ वरिष्ठ अधिकारी कारवाईच्या जाळ्यातराज्यातील लाचखोरीचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही. कार्यालयात आठ तासांची ड्यूटी, पंखे, वातानुकूलित केबिन, गडगंज पगार, ये-जा करायला शासनाची चारचाकी अशी स्थिती असतानाही देखील जवळपास दीडशे अधिकारी मागील ११ महिन्यांत लाचखोरीत अडकले आहेत. त्यात 'क्लास-वन'चे ९८ अधिकारी तर १८९ 'क्लास-टु'चे अधिकारी आहेत. काहीजण कुटुंबाचा कोणताही विचार न करता दोनशे ते पाचशे रुपयांची लाच घेताना सुद्धा सापडले आहेत. लाचखोरीची आकडेवारीजानेवारी २०२१ ते ३१ मे २०२२ सापळे११५९लाच घेताना सापडलेले१६३३३० जून २०२२ ते ६ जून २०२३सापळे७२५लाचखोर संशयित१०३८तक्रारीसाठी १०६४ टोल फ्री क्रमांकावर करा कॉललाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून दरवर्षी मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली जाते. विभागाकडून संबंधितावर लगेचच कारवाई होत असल्याने तक्रारदार आता पुढे येत आहेत. तक्रारदाराला कारवाईच्या माध्यमातून न्याय मिळत आहे.

# दुष्काळाचे सावट



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**ऑगस्ट महिना संपला तरी राज्यात पावसाने म्हणावा तसा जोर धरलेला नाही. राज्यातील बहुतांश भागात ऑगस्ट महिना कोरडाच गेला आहे. मागील १२२ वर्षात ऑगस्ट महिन्यातील सर्वात कमी पाऊस यावर्षी नोंदला गेला. केवळ ऑगस्टच नव्हे तर जून आणि जुलै महिनेही कोरडेच गेले आहेत. मान्सूनपूर्व पावसानेही दगा दिला आहे. मागील तीन महिन्यात सरासरी इतकाही पाऊस झाला नाही त्याचा विपरीत परिणाम पेरण्यांवर झाला आहे. या तीन महिन्याचे सरासरीच्या पन्नास टक्केही पाऊस झाला नाही. देशात सर्वात कमी पाऊस मराठवाड्यात झाला आहे. मराठवाड्यावर वरुण राजाची कायमच वक्रदृष्टी राहिली आहे. मृग नक्षत्र कोरडे गेले. आदरा नक्षत्रात काही ठिकाणीच पाऊस झाला आता चालू नक्षत्र संपेपर्यंत दमदार पाऊस होईल की नाही याची शाश्वती नसल्याने मराठवाड्यावर दुष्काळाची गडद छाया पसरली आहे.**

जून आणि जुलै महिन्यात पुरेसा पाऊस न झाल्याने पेरण्या करण्यास बळीराजा धजावला नाही परिणामी मराठवाड्यात अद्यापही म्हणाव्या तशा पेरण्या झाल्या नाहीत. राज्यातील इतर भागातही जवळपास हीच परिस्थिती आहे. बळीराजाने पावसाचा अंदाज घेऊन पेरण्यांचे नियोजन केले. मात्र केलेल्या पेरण्या वाया गेल्या आहेत त्यामुळे बळीराजावर आता दुबार पेरणीचे संकट आले आहे. बळीराजने वरुण राजाची प्रार्थना करूनही वरुण राजा प्रसन्न झाला नाही त्यामुळे बळीराजाची चिंता वाढली आहे. गेल्यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने या काळापर्यंत शेतीची बहुतांशी कामे पूर्ण झाली होती. यावर्षी पुरेसा पाऊस न झाल्याने कपाशी, धान, सोयाबीन, कडधान्ये या सारखी मुख्य पिके धोक्यात आली आहेत. पिकांनी मान टाकल्याने बळीराजाच्या डोळ्यात अश्रूंचा महापूर आला आहे. बळीराजाची नजर आकाशाकडून हटायला तयार नाही. राज्यावर दुष्काळाचे सावट असल्याने बळीराजा चिंतेत आहे. पुरेसा पाऊस न झाल्यामुळे पिके धोक्यात आली आहे त्याचा फटका फक्त बळीराजालाच नव्हे तर सर्वांनाच बसणार आहे. पाऊसपाण्याची वेदना केवळ बळीराजाची वाटत असली तरी प्रत्यक्ष तिचे व्यापक परिणाम होत असतात. उत्पादन कमी झाले तर अन्नधान्याच्या किंमतीवर त्याचा परिणाम होत असतो आणि सगळ्यांनाच महागाईचा सामना करावा लागतो. सर्वसामान्य आणि नोकरदारवर्गाची आर्थिक कुचंबणा होते. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याचीही टंचाई निर्माण होते. आज राज्यातील धरणांनी तळ गाठला आहे. मागील वर्षी यावेळेपर्यंत राज्यातील बहुतांश धरणे भरली होती यावर्षी मात्र बरोबर उलटे चित्र पाहायला मिळत नाही. पाऊस न झाल्याने धरण उशाला कोरड घशाला अशी परिस्तिथी अनेक शहरांची झाली आहे. यावर्षी पुरेसा पाऊस न झाल्याने पुढील वर्षी राज्यात पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न उभा राहणार आहे. गुराढोरांच्या चारा पाण्याचा प्रश्नही आवासून उभा आहे. जर अशीच परिस्थिती राहिली तर सरकारला गुरांसाठी छावण्या उभ्या कराव्या लागतील. पाऊस न झाल्यास अशा विपरीत गोष्टी घडतील याउलट जर पाऊस चांगला झाला, भरघोस पीके आली



तर त्याचा बाजारपेठेवर आणि एकूणच देशाच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा चांगला परिणाम होतो. सरकारलाही विकास कामांसाठी पैसा उपलब्ध होतो. बळीराजाचे नुकसान झाले की सारकरला त्यांना नुकसानभरपाई द्यावी लागते त्यामुळे विकास कामांना कात्री लागते. एकूणच पावसाअभावी पिके धोक्यात आली तर त्याचा खूप दूरगामी परिणाम होतो. हा परिणाम केवळ बळीराजावरच नाही तर समाजातील सर्व घटकांवर होतो त्यामुळेच आता उरलेल्या सप्टेंबर महिन्यात तरी वरुण राजाने कृपा करावी असे साकडे बळीराजा वरुण राजाला घालत आहे. जर वरुण राजाने कृपा केली नाही आणि सप्टेंबर महिनाही मागील तीन महिन्याप्रमाणेच कोरडा गेला तर बळीराजा हतबल होईलच पण त्याचा परिणाम राज्याचा अर्थव्यवस्थेवर देखील होईल. हवामान विभागाने सप्टेंबरमध्ये सरासरी इतका पाऊस होईल अशी शक्यता वर्तवली आहे मात्र ही शक्यता खरी ठरेलच की नाही याची शाश्वती कोणी देऊ शकत नाही आणि जरी सप्टेंबरमध्ये चांगला पाऊस झाला तरी मागील तीन महिन्यात ५० टक्केही पाऊस न झाल्याने राज्यावरील दुष्काळाचे सावट कायम राहणार आहे म्हणून या संभाव्य दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी शासन प्रशासनाने आतापासूनच युद्धपातळीवर प्रयत्न करायला हवे.

# सरकार! चारा द्या, नाहीतर जनावरांना तहसील कार्यालयात सोडणार

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा संतप्त सवाल : तहसीलदार सावंत यांनी केली दुष्काळग्रस्त गावांची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** तालुक्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने यंदाचे वर्षे कसे जाणार याची चिंता नागरिकांना भेडसावू लागली आहे. यावर्षी 'ना पाऊस ना धान्य' अशी काहीशी स्थिती निर्माण झाली आहे. विहिरी कोरड्याठाक पडल्या असून शेतीतील बोअरमध्ये पाण्याचा थेंबही शिल्लक नसल्याने पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे आगामी काळात आणखीनच भीषण परिस्थिती निर्माण होण्याची चिन्हं दिसत असल्याचे नागरिकांमधून वर्तविले जात आहे. दोन दिवसापूर्वी तहसील कार्यालयासमोर रुमणे आंदोलन करण्यात आले. तहसील कार्यालयात भेट घेऊन दुष्काळी परिस्थितीची सविस्तर माहिती दिली याची दखल घेत लोणीखुर्द सर्कल मध्ये टुनकी लोणीखुर्द तलवाडा, भादली येथे पीक पाहणी करून तहसीलदार सुनील सावंत यांनी शेतकऱ्याच्या व्यथा जाणून घेतल्या. यावेळी तालुका कृषी अधिकारी बि. एस. ठक्के मंडळ कृषी अधिकारी एस. एम. पाटील कृषी पर्यवेक्षक डी. व्ही. पुंड, ए.डी. सपाटे कृषी सहाय्यक ललिता लकारे एस.एन. सोनटक्के, मांदळे, पी.एम. देशमुख, तलाठी आर. के. गायकवाड, ग्रामसेवकआर आर पवार, मा,आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर मा.सभापती भागिनाथ मगर,राजेंद्र मगर, रिखब पाटणी, हिंदवी जनक्रांतीसेनेचे अध्यक्ष अजय पाटील साळुंके छावा संघटनेचे अध्यक्ष किशोर मगर, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष दादा, तांबे भाऊसाहेब मगर, शांताराम मगर दादाभाऊ मगर, दत्तु मगर, तातेराव मगर, वसंत मगर यांची प्रमुख उपस्थिती होती. यंदाचा दुष्काळ हा सन 1972 पेक्षाही भयावह असेल असे जुन्या जाणकार तज्ज्ञांकडून बोलले जात असून याचा ग्रामीण भागात याचा मोठा फटका बसणार आहे. सर्वप्रथम आज पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या अनेक भागात निर्माण झाल्या आहे. एकट्या तलवाडा गावात 45 मेंढपाळ असून 15 हजारांच्या आसपास मेंढ्याची संख्या असून इतर जनावरे वेगळीच अनेक गावांचा ग्रामपंचायतींनी टॅकर सुरू मागणी केली आहे. परिसरातील बहुतांशी जलस्त्रोत आटलेले आहेत तर बरेच तलाव कोरडेठाक पडले आहेत.



शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करून जलयुक्त शिवार राबविले मात्र कमी पावसामुळे भरलेच नाहीत. अनेक शेतकऱ्यांनी शेतीपिकात जनावरे सोडून दिल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे येणाऱ्या काळात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नदेखील गंभीर होणार आहे. तालुक्यात अनेक गावामध्ये गावाला पाणीपुरवठा करणारी नळयोजना पाण्याअभावी बंद पडल्या. तालुक्यातील विहीरी पाईपलाईन आधिग्रहन करण्याचे प्रस्ताव दाखल आहेत. येणाऱ्या काळात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांसह जनावरांना मोठी समस्या निर्माण होणार आहेत. आमच्या अनेक शेतकऱ्यांनी पाणी व चाऱ्याअभावी जणावरे बाजारात कवडीमोल भावात विकली जात आहेत. लोणीखुर्द परिसरात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणावर होऊ लागली आहे त्यातच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नदेखील गंभीर बनला आहे. प्रशासनाने पशूधन वाचविण्यासाठी चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहेत.

# महिला समानता दिवस



सीमा गाडेकर
संपर्क क्र. 9423172305

आधुनिक केसरी

**परवा नुकताच 26 ऑगस्ट हा दिवस महिला समानता दिवस म्हणून साजरा केला गेला. विविध माध्यमातून महिला समानतेबद्दल वाचायला व ऐकायला मिळाले. महिलांप्रती एवढे छान छान मते वाचून माझ्या मनात विचार आला खरंच महिला समानता आहे का? मी एक महिला असल्यामुळे मला अजून जास्त उत्सुकता त्याबद्दल लागली.. आणि मी त्या मागचा इतिहास काय आहे याच्या शोध मोहिमेला लागले.. या पाठीमागचा इतिहास म्हणजे अमेरिकेत महिलांना दुय्यम स्थान होते. महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी पहिल्यांदाच 1853 मध्ये तेथील महिलांनी एकत्रित येऊन लढाई सुरू केली ही लढाई 1920 पर्यंत चालली.**

26 आगस्ट 1920 रोजी 19 व्या कायदादुरुस्तीतून अमेरिकेतील महिलांना पहिल्यांदा मतदानांचा अधिकार मिळाला.याचबरोबर महिलांना समानतेचा हक्क आणि दर्जा मिळावा यासांठी संघर्ष करणाऱ्या महिला वकील बेल्ला अब्जुग यांच्या प्रयासातून 1971 पासून 26 आगस्ट हा दिवस महिला समानता दिवस म्हणुन घोषित करण्यात आला आणि तेव्हापासून तो महिला समानता दिवस म्हणून पाळण्यात येऊ लागला.

अर्थात 1971 पासून महिला समानतेची ही ज्योत आजतागायत तेवतआहे पण अगदी मीनमीनत्या रूपात असं म्हणायला हरकत नाही... कारण आजही खेड्यापाड्यात मुलगा आणि मुलगी हा भेदभाव मोठ्या प्रमाणावर केला जातो नुसतं खेड्यापाड्यातच नाही तर शहरी भागातही हा भेदभाव आपल्याला सर्रास पाहायला मिळतो.

मुलाला वंशाचा दिवा मानला जातो आणि त्याला पाहिजे ते शिक्षण घेण्यासाठीआई बाप कर्जबाजारी होऊन त्याच्या शिक्षणासाठी राबत असतात..

पण मुलींच्या बाबतीत विचार करताना जेव्हा घरात मुलगी जन्माला येते तेव्हा त्या नुकत्याच जन्मलेल्या मासाच्या गोळ्याबद्दल तिच्या लग्नासाठी येणाऱ्या खर्चापर्यंतचा विचार केला जातो .... तिच्या लग्नासाठी लागणारा हुंडा कसा जमा करायचा इथपर्यंत विचार केला जातो... मुली ह्या परक्याचं धन असतात आणि तिचं लवकरात लवकर लग्न करून आपल्या डोक्यावरचं ओझे कसं कमी करता येईल याच दृष्टिकोनातून मुलीकडे पाहिले जात... भलेही ती मुलगी अभ्यासात खूप हुशार असली तरी तिच्या शिक्षणापेक्षा तिच्या लग्नाला जास्त प्राधान्य दिले जात. आपल्या मुलीला नोकरदार नवरा मिळावा म्हणून नोकरी असणाऱ्या त्यातली त्यात सरकारी नोकरी असणाऱ्या मुलाचा शोध केला जातो आणि तो मागेल तो हुंडा देण्यासाठी मुलीच्या घरचे कर्जबाजारी होऊन तिचं लग्न लावून देतात.... अर्थातच अशा घटनांमध्ये मुलीचे शिक्षण पूर्ण झालेलं नसतं.. तुझ्या शिक्षणाचा आम्हाला काय उपयोग आहे. तुझ्या शिक्षणामुळे चालून आलेलं चांगलं स्थळ जाईल. तुला शिक्षणाची एवढी हौस आहे तर तू लग्नानंतर सासरी जाऊन शिकत बस बाई असं तिला ऐकवलं जातं ...



त्यातली त्यात एखादी हुशार मुलगी जेव्हा आपल्या आई बापाकडे उच्च शिक्षणासाठीचा हट्ट करते तेव्हा .. बाई तुझ्या शिक्षणासाठी आम्ही एवढा पैसा कुठून आणायचा असं तिला बोललं जातं.. तुझ्यापेक्षा तुझ्या भावाचं शिक्षण घेणं किती जरुरी आहे आणि त्याच्या शिक्षणासाठी आधीच आम्हाला किती वार्षिक खर्च लागतो हे तिला समजावून सांगितलं जातं... आम्हाला माहिती आहे लहानपणापासूनच तू खूप समजदार मुलगी आहेस आणि तुझा तुझ्या भावामध्ये किती जीव आहे अशा गोंडस कौतुकाखाली तिला शिक्षणापासून वंचित ठेवल्या जात...... आणि इथेच शिक्षणाच्या बाबतीत महिला समानता धूसर होते. मला एक कळत नाही जे आई बाप मुलीच्या लग्नासाठी खर्च करायला तयार असतात तोच खर्च जर त्यांनी तिच्या शिक्षणावर केला तर त्यांचं कोणतं गणित बिघडणार असतं.... तिच्या शिक्षणावर केल्या गेलेल्या खर्चामुळे खऱ्या अर्थाने ती आर्थिक दृष्ट्या स्वतःच्या पायावर उभा राहील हा विचार मुलींच्या बाबतीत का केला जात नाही...... हे खरचं कुठेतरी थांबायला हवं.शिक्षण असो किंवा स्वतःच्या आयुष्याबद्दलच्या निर्णयाबद्दल निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मुलीला मिळायला हवे.

वधूवर सुचक समुहावर सतत मुलींच्या अपेक्षा खूप वाढत चालल्या असं सर्रासपणे बोलल्या जातं पण हे बोलणारे हे लक्षात घेत नाहीत की,,,

इतकी वर्ष वधू पाहिजे अशा जाहिरातीं वाचताना मुलांच्या अपेक्षा कधी तुम्ही बारकाईने वाचल्यात का? मुलगी गोरी हवी, सडपातळ हवी, मुलीचं नाक चाफेकळी हवं,घरात मिळून मिसळून असणारी असावी, तिला स्वयंपाक आला पाहिजे, तसेच ती आपल्या बरोबरीचे शिक्षण घेतलेली व सरकारी किंवा खाजगी नोकरी करणारी असावी... मुलीची उंची इतकी इंच पाहिजे, तसेच तिने सर्वांचा मान राखून ,आई-वडिलांची सेवा पण केली पाहिजे इत्यादी इत्यादी इतक्या सगळ्या अपेक्षा करणं अगदी मान्य...!!!! पण तिच्या अपेक्षांचे काय ???

जेव्हा एखादी उच्चशिक्षित असणारी मुलगी मोठ्या पदावर दर महिन्याला लाख रुपये पगार कमवत असेल तर तिला कार्यालयामध्ये कामाचं टेन्शनही तेवढेच मोठं असेल या गोष्टी सासरच्या लोकांकडून का समजावून घेतल्या जात नाही??? सासुसास-यांना सांभाळणं तिचं कर्तव्य आहेच ते तिने पार पाडलंच पाहिजे.... पण मुलांनेही तिच्या बरोबरीने स्वतःच्या आईवडिलांची काळजी घ्यायला हवी.पुरुष हवा तसा फिरत रहाणार...मित्र,पार्ट्या ,सहली यात लग्नानंतर बदल करणारी किती मुलं असतात ??? मुलगी नको म्हणून सतत प्रयत्न करणारे कितीतरी सुशिक्षित जोडपे आपण पाहतो... अशा जोडप्यांना जेव्हा कळतं की त्यांना होणार मुल हे स्त्री जातीचा आहे तेव्हा गर्भातच तिची हत्या केली जाते... तिला गर्भातच कुस्करून मारल्या जात. का तर ती एक एक मुलगी आहे म्हणून .... आणि यामुळेच दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे आणि दिवसेंदिवस ही बाब अजून गंभीर बनत आहे. लोकसंख्येत जर स्त्रियांचे प्रमाण समान नसेल तर महिला समानता कुठून येणार???खरंतर अपत्य जन्म हा प्रत्येक पालकांसाठी एक आनंदोत्सव असतो.. पण आपल्या पाल्याला आपण कस वळण लावतो हे पण तितकच महत्त्वाचा आहे ?? मुलांना वाढवताना आपण त्यांना समतेचे धडे देतो का ??? आपली मुलगी किंवा मुलगा समोरच्याचा आदर करतो का ? मुले लहान असतानाच आपण तसे त्यांना शिकवतो का??? एका अगदी साध उदाहरण घ्यायचं झालं तर आपल्याला असं दिसून येतं की हल्ली मुला मुलींना मोठ्यांच्या पायाला वाकून नमस्कार करणे म्हणजे कमीपणा वाटतो कारण मुलांमध्ये नम्रतेचा मागमूसही नसतो....तुम्ही जेव्हा कोणाच्या पाया पडता किंवा वाकून नमस्कार करता तेव्हा तुम्ही अजिबात छोटे होत नसता....!!!पण तुमच्या या छोट्याशा कृतीने तुम्ही समोरच्याच्या हृदयात जागा करत असता हे मात्र नक्की... तशी ही गोष्ट छोटीशीच आहे पण खूप महत्वाची आहे...!!!!

प्रत्येक पालक शिक्षणाच्या बाबतीत आणि लग्नाच्या बाबतीत जेवढा विचार आपल्या मुलाच्या अर्थात वंशाच्या दिव्याच्या बाबतीत करतो तितकाच विचार जेव्हा तो मुलीच्या शिक्षणाच्या बाबतीत करेल. तसेच मुलगा आणि मुलगी यांच्यात भेद न करता मुलीच्या जन्माचे पण जंगी स्वागत करेल त्या दिवशी तेव्हाच खऱ्या अर्थाने स्त्री पुरुष समानता मनात रुजेल... आणि तोच दिवस खऱ्या अर्थाने महिला समानता" दिवस ठरेल असे मला वाटते.

# पावसाचे पाणी आटले, डोळ्यात दाटले !



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**पावसाने दांडी मारल्याने महाराष्ट्रात दुष्काळाचे सावट सर्वत्रच दिसून येत आहे.राज्यात पाऊस पडला सर्वच काही ठीक होतं.परंतु अचानक पाऊसाने पाठ फिरविल्याने आभाळातुन पाऊस न पडता शेतकऱ्यांचे डोळ्यांतून पाणी निघतांना दिसत आहे, तर दुसरीकडे पाऊसाच्या गैरहजेरीमुळे सर्वसामान्यांना अनेक प्रकारच्या आजारांनी(व्हायरल इन्फेक्शन)जखडल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.यामध्ये डेंग्यू, मलेरिया, ताप, काविळ, डोळे येणे अशाप्रकारच्या अनेक आजारांचा सामना संपुर्ण महाराष्ट्र वासियांना करावा लागतो आहे. महाराष्ट्रात पाऊस झाला खरा परंतु सरासरी पेक्षा अत्यंत कमी पाऊस आतापर्यंत झालेला आहे. यामुळे राज्यातील पावसाची परिस्थिती अत्यंत भयावह व चिंताजनक आहे. राज्यात आतापर्यंत पडलेल्या पावसाचे प्रमाण अमरावती विभाग 29 टक्के, नागपूर विभाग 55 टक्के, कोकण विभाग 28 टक्के, नाशिक विभाग 20 टक्के, पुणे विभाग 22 टक्के, औरंगाबाद विभाग 22 टक्के अशाप्रकारच्या पावसाच्या लंपंडावामुळे संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळाचे बादल दिसून येत आहे.**

आधीच मान्सून उशिरा आला त्यात जून महिना कोरडा गेला. जुलै महिन्यात थोडाफार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या पेरण्या झाल्या. मात्र ऑगस्ट महिना जवळपास कोरडा गेला. यामुळे महाराष्ट्रातील खरीप पिके संकटात सापडली आहे आणि पाऊसाच्या दांडीमुळे लहान मुलांच्या व वृध्दाच्या प्रकृतीवर मोठ्या प्रमाणात परिणाम होतांना दिसत आहे.त्यामुळे पाऊसाच्या दांडीमुळे आरोग्यावर सुध्दा मोठा गंभीर परिणाम होतांना दिसतो.आतापर्यंत देशातील ईशान्य भारतात सरासरी पेक्षा 19 टक्के,मध्य भारतात 4 टक्के, दक्षिण भारतात 15 टक्के कमी पाऊस झालेला आहे.उत्तर भारतात मात्र सरासरीपेक्षा 8 टक्के अधिक पाऊस झाला असून अनेक राज्यांमध्ये पूरस्थिती दिसून येते.महाराष्ट्रात पाऊसाने चांगलीच दांडी मारल्याने अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत.यामध्ये मानव पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांना गंभीर परिणाम भोगावा लागत आहे.यावर्षी पाऊसाची टक्केवारी कमी असल्याने पुढे चालून पाण्यामध्ये तुट पडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. ऑगस्टमध्येच राज्यात पाणीटंचाई भासायला सुरूवात झाली आहे. त्यामुळे सध्या पावसाच्या सुरू असलेल्या लंपंडावामुळे अनेक जिल्ह्यांत भीषण पाणीटंचाई दिसुन येते.परिणामी अनेक गावांना आणि वाड्यांना टॅंकरने पाणीपुरवठा केला जात असुन गेल्या वर्षीच्या तुलनेत ही संख्या कितीतरी पटीने अधिक असल्याने ऑगस्टमध्येच दुष्काळाचे भीषण वास्तव समोर आले आहे.असे सांगितले जाते की 122 वर्षांनंतर प्रथमच ऑगस्टमध्ये एवढा भयावह कोरडा दुष्काळ पडलेला आहे. देशातील काही राज्य वगळता देशभरात पाऊसाची सर्वत्रच बोंबाबोंब दिसून येते. ऑगस्ट महिन्यात मध्य महाराष्ट्र, दक्षिण कर्नाटक, दक्षिण तेलंगणा, केरळ, पूर्व उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, नागालॅंड, मिजोरम, मणिपूर, त्रिपुरा,लक्षव्दीप याभागात अत्यल्प पाऊस पडल्याने इथेही भयावह स्थिती निर्माण झाली आहे. मुख्यत्वे करून हवामानातील आमुलाग्र बदल, जंगल कटाई, वाढते औद्योगिकीकरण व परमाणु परिक्षण यामुळे निसर्गाचे संपूर्ण संतुलन डगमगलेले आहे यामुळेच दिवसेंदिवस निसर्ग कोपत आहे.त्याचाच परिणाम आज आपल्याला भोगावा लागतो आहे. वाढत्या तापमानामुळे समुद्राचे पाणी दिवसेंदिवस उष्ण होत आहे. परिणामी भारतीय उपखंडात कमी पाऊस पडत असल्याचे सांगितले जाते. या घटनेला शास्त्रीय दृष्ट्या अल निनो म्हणतात. अल निनोमुळेच भारतातील मानसुनची वाटचाल रोखली जाते असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.परंतु आजच्या परिस्थितीत पाऊसाच्या बाबतीत महाराष्ट्र डेंजर झोनमध्ये आल्याचे दिसून येते. विदर्भ आणि मराठवाड्यात 5 ते 7 सप्टेंबर दरम्यान पाऊस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.म्हणजेच पावसाच्या गैरहजेरीमुळे अनेक कठीणायीचा सामना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना व सर्वसामान्या भोगावा लागेल हे स्पष्ट दिसुन येते.राज्यात पुढील महिनाभरात समाधानकारक पाऊस झाला नाही तर उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो.म्हणजे सर्वंच गोष्टींचा विचार केला परिस्थिती अत्यंत कठीण व गंभीर आहे. त्यामुळे असं झालं आहे की पाणी आटलं, डोळ्यात साठलं! सध्याच्या परिस्थितीत तर राज्याच्या काही भागात उन्हाळ्या सारखे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांची अशी परिस्थिती झाली आहे की जगावं की मरावं अशी भयावह स्थिती निर्माण झाली आहे. कारण धानाच्या शेतीवर विपरीत परिणाम होत आहे, सर्वसाधारण पिके कोमावत आहे,पुढेचालून पिण्याच्या पाण्याची समस्या ओढावतांना दिसत आहे. त्यामुळे राज्यात पावसाने दांडी मारल्याने सर्वत्र दुष्काळाची छाया पसरली आहे.अशा परिस्थितीत भीतिचे वातावरण निर्माण झाले आहे. कारण धरणे तळाशी, तर पिकांचे प्राण कंठाशी येवून ठेपले आहे.पावसाची कठीण परिस्थिती पहाता संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांनी व पक्षांनी राजकारण बाजूला सारून या विषयावर गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. देशातील 21 राज्यांमध्ये सामान्य पावसापेक्षाही कमी पाऊस झालेला आहे.देशातील दक्षिण व पूर्वोत्तर राज्य सोडले तर अनेक राज्यांमध्ये पाऊसाने पाठ फिरवली आहे ही चिंताजनक बाब आहे.मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो हे वरूणराजा लवकरात लवकर पृथ्वीवर प्रगट हो व सर्वत्र पाऊस पडुदे. मी लेखणीच्या माध्यमातून सरकारला विनंती करतो की जंगल तोड ताबडतोब थांबवुन घर तिथे झाड व पडीत किंवा बंजार जमिनीवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे.



# आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या आंदोलनाची भूमिका रास्त.... आणि पवित्रा सकारात्मक...

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : ३०

आमदार बच्चूभाऊ कडू यांनी व त्यांच्या प्रहारच्या कार्यकर्त्यांनी काल क्रिकेटपटू, भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्या बंगल्यासमोर आंदोलन केले. ते आंदोलन सचिन तेंडुलकर करत असलेल्या ऑनलाईन गेमींगच्या जाहिरातीच्या विरोधात होते. आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या आंदोलनाचा पवित्रा सकारात्मक होता. त्यांचे म्हणणे रास्त होते. आणि त्यांची मागणीही रास्त होती. सचिन तेंडुलकर यांना क्रिकेटचा देव मानणाऱ्यांची संख्या अगणित आहे. म्हणून त्यांनी अनेक कंपन्यांच्या जाहिराती करणे गैर नाही. सचिन तेंडुलकर यांचे क्रिकेटमधील योगदान पाहून त्यांना भारताने 'भारतरत्न' हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा सन्मानच केलेला आहे. भारतरत्न ह्या सर्वोच्च सन्मानाचे मानकरी अत्यंत बोटावर मोजण्याइतके आहेत. देशासाठी ज्यांनी फार मोठा त्याग केला आहे, फार मोठी कुर्बानी दिलेली आहे अशांना भारत सरकार 'भारतरत्न' हा पुरस्कार देते. 'भारतरत्न' हा भारत देशाची इभ्रत मोठी करणारा पुरस्कार आहे, तो पुरस्कार भारत सरकारने शहीद भगतसिंग यांना, महात्मा फुले यांना, साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे यांना दिलेला नाही; परंतु तो सचिन तेंडुलकर यांना दिलेला आहे, असे आ.बच्चूभाऊ कडू यांचे म्हणणे आहे. म्हणून भारतरत्न दिलेल्या सचिन तेंडुलकर यांनी ऑनलाईन गेमींगच्या, जुगाराच्या जाहिराती करू नये. तो भारतरत्न पुरस्काराचा अपमान आहे, नाहीतर 'भारतरत्न' हा पुरस्कार परत करावा व खुशाल जाहिराती कराव्यात. तुम्हाला भारतरत्न पुरस्कार असल्यामुळे तुम्हाला अशा ऑनलाईन जुगाराच्या जाहिराती करणे शोभणारे नाही. हा आमदार बच्चूभाऊ कडू यांच्या आंदोलनाचा पवित्रा सकारात्मक होता.आ. बच्चूभाऊंचा हा विचार अतिसामान्य माणसालाही पटणारा आहे. भारतरत्न हे जर पैशासाठीच जाहिराती करत असतील तर येत्या गणेशोत्सवात प्रत्येक ठिकाणी गणपतीजवळ दहा दिवस एक दानपेटी ठेवून तो सर्व निधी सचिन तेंडुलकर यांना देऊ. हा विचार खोचक नसून किंवा विरोधासाठी विरोध नसून समजावणीच्या सुरातला आहे. अगोदरच अनेक कुटुंब या ऑनलाईन गेमींगच्या जाहिरातीमुळे उध्वस्त होत असल्याचे दिसत असताना तरुण पिढीला चांगले विचार देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. जेणेकरून 'भारतरत्न' समजल्या जाणाऱ्या व्यक्तींकडून समाजातील तरुणांना चांगला आदर्श मिळावा, चांगली प्रेरणा मिळावी. भारतरत्न मिळालेला व्यक्ती तरुणपिढ्यांचा आयकॉन ठरावा. आयडॉल ठरावा. क्रिकेट मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांनी ऑनलाईन गेमींगच्या जुगाराच्या जाहिराती करून तरुणांची आपल्या कर्तृत्वाबद्दल असलेली अस्मिता गमावू नये. अत्यंत सरळ, साधा, खरा विचार आ. बच्चूभाऊ कडू यांच्या आंदोलनाचा होता. आमदार बच्चूभाऊ कडू हे नेहमी विकृतीवर बोट ठेवत आले आहेत. त्यांची आंदोलने तरुणांचा आणि शेतकरी वर्गाचा कैवार घेणारी असतात. मात्र अनेक पुढारी हे तरुण पिढीचा वापर केवळ मागे मागे फिरण्यासाठी करतात म्हणून आजचा बहुसंख्य तरुण बेरोजगारी व महागाईच्या विळख्यात सापडलेला आहे. शेतकरी वर्ग कोरड्या दुष्काळाच्या संकटात सापडलेला आहे. एकीकडे भारतात कोट्यावधी तरूण बेरोजगार आहेत. त्यांच्या हाताला काम नाही. कमालीच्या महागाईने गरीब आणि मध्यमवर्गीय माणूस त्रस्त आहे. शिक्षणाच्या खाजगीकरणाने गरीबांच्या शिक्षणाचे तीनतेरा वाजवले आहेत.





तरुणांना चांगले शिक्षण घेण्यासाठी तारुण्य गमवावे लागत आहे. उपवर झालेली मुले, मुली कुटुंबाला आपला हातभार लागावा यासाठी नोकरीच्या, रोजगाराच्या शोधात फिरत आहेत. देशातल्या तरुणाईपुढे जगण्याचे प्रश्न आहेत. नोकरीच्या, रोजगाराच्या संधी मिळून आयुष्यात स्थैर्य कसे लाभेल यासाठी तरुणवर्ग चिंतातूर आहे.आजच्या तरुणांना आर्थिक सक्षम करण्यासाठी सरकारकडे कोणतेच ठोस कार्यक्रम नाहीत. नोकरीच्या परिक्षेच्या अर्जासाठी कोटी रुपये उकळले जातात आणि ऐनवेळी सांगितले जाते की, परीक्षा रद्द झाल्या. म्हणजे भारत सरकार तरुणवर्गाचे अशाप्रकारे शोषण करत आहे. एकतर डोक्याचा भुगा होईस्तोवर अभ्यास करून परीक्षा देण्याची तयारी करायची आणि ऐनवेळी परीक्षा रद्द झाल्या म्हणून ऐकून घ्यावयाचे. अशा सगळ्या बाजुंनी होणारे शोषण आणि त्या शोषणाचे परिणाम भोगणारे तरुण जीवन संपविण्याचा विचार करणार नाहीत तर काय करतील ?

कोट्यावधींची संपती असणाऱ्या एखाद्या पुढाऱ्यांने किंवा कोट्याधीश कलावंतांने, किवा एखाद्या उद्योगपतीने किंवा एखाद्या कोट्याधीश क्रिकेट पट्टूने तरुणवर्गासाठी आपल्या मिळकतीतला दहा पाच टक्के हिस्सा तरुणांच्या शिक्षणावर खर्च केला का ? दहा-पाच तरुण दत्तक घेतलेले आहेत का? उलट या तरुणांची दिशाभूल करणाऱ्या जाहिराती केल्या जात आहेत. तरुणांची मने भरकटवली जात आहेत. त्यांना संभ्रमात टाकण्यात येत आहे. त्यांना ऑनलाईन जंगली रम्मी सारख्या आभासी खेळाला बळी पाडण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे फंडे समोर केले जातात. जपान, चीन,अमेरिका, कॅनडाचा तरूण वेगवेगळ्या प्रकारचे शिक्षण घेत आहेत. मोठमोठ्या हुद्यावर जाण्यासाठी रात्रंदिवस मेहनत करत आहेत. मात्र आमच्या भारतातल्या तरुणांना कावडयात्रा, पायीदिंडी काढण्यासाठी पुढारी लोकांकडून पैसा पुरवला जातो. त्यांना शिक्षणापासून, परिवर्तनीय विचारापासून दूर भरकटवले जाते, त्यांच्या डोक्यात धर्मद्वेषाचे, जातीयद्वेषाचे विचार पेरण्याचे काम केले जाते. तरुणांची मने भरकटवण्यामागे सत्ताधारी लोकांचा स्वार्थी विचार असतो. अलिकडे अनेक अभिनेते भंकस जाहिराती करत आहेत. त्या जाहिरातीतले ते स्वतः काहीच वापरत नाहीत; मात्र आडमाप पैसा घेऊन जाहिराती करतात. ते स्वतः कोकाकोला, थम्सअप, स्प्राईट सारखे भंगार थंडपेय पीत असतील का ? अजिबात नाही, कारण त्यांना सौंदर्य जपावे लागते आणि सौंदर्य जपण्यासाठी आहारावर खूपच नियंत्रण ठेवावे लागते. मग अभिनेता, अभिनेत्री यांनी स्वतःला जपावे. आणि इतरांनी कसल्याही वस्तु पदार्थ, थंडपेय खरेदी करून आपले आरोग्य बिघडवावे का ? दुसऱ्याबद्दल चांगला विचार या नावलौकिक मिळवलेल्या लोकांच्या मनात येवू नये का ? एवढा सदसद्विवेकीविचार या जाहिराती करणाऱ्या लोकांच्या डोक्यात यावा. भरकटलेल्या तरुणांनी आभासी जगातील कोणत्याही भूलव्या प्रकाराला बळी पडू नये व सर्वोच्च न्यायालयानेही अशा भूलव्या जाहिरातींवर, आभासी ऑनलाईन जंगली रमी सारख्या जाहिरातीवर निर्बंध लावावेत. जेणेकरून या देशातल्या तरुणपिढ्यांची फसवणूक होणार नाही; आजचा तरुण हा उद्याच्या विज्ञानवादी, प्रगतीशील मजबूत भारताचा सक्षम नागरिक असावा म्हणून तरुणवर्गाच्या भविष्याचा विचार हाच प्रगतशील राष्ट्राचा विचार असेल !



# अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या जड वाहने घेतला युवकाचा बळी

## खंडपीठाच्या निर्णयाला केराची टोपली

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील गौताळा अभायाआरण्यातुन अवैध रित्या वाहतुक करणाऱ्या जड वाहने घेतला एका युवकाचा बळी नागद धनगरवाडी येथील मृत युवक असुन योगेश आहिरे, वय 22, रा . धनगरवाडी असे मृताचे नाव आहे. चाळीसगाव कन्नड घाट तसेच नागदघाट जड वाहणास औरंगाबाद खंडपीठाने निर्णय देऊन अवजड वाहतुक बंद केली. मात्र वनपरीक्षेत्र अधिकार प्रविण पारधी यांनी मात्र खंडपीठाला केराची टोपली दाखवली आहे. अवजड वाहतुम मात्र गौताळा अभायाआरण्यातुन सुरूच आहे. या मुळे विभागाचा भोंगळ कारभार समोर येत मागेही दि 16 ऑगस्टला आयशर व मोटार साईकल अपघातात पशुधन पर्यवेक्षक गंभीर जखमी झाले आहे. आज देखील धनगरवाडी येथील युवकाला माल वाहतुक पिकअपने धडक दिल्याने योगेश आहिरे यांचा जागीच मृत्यु झाला आहे. अश्या अनेक प्रकारचे अपघात गौताळा अभायाआरण्यात सुरू आहे. पर्यटकांना फिरण्यास बंदि घातली असून मात्र अवजड वाहणे मात्र जोरात सुरू असून खंडपीठाचे सर्व नियम धाब्यावर ठेऊन अधिकारी व कर्मचारी मात्र केराची टोपली दाखवत असल्याने नातेवाईकांचा चांगलाच संताप दिसून येत आहे. योगेश यांचा जागीच मृत्यु झाल्याने वनअधिकारी व कर्मचारी यांचा हलगर्जी पणा दिसुन येत आहे या कडे वरीष्ट अधिकारी लक्ष देणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले.

> घटना घडली तेव्हा आम्ही कन्नड शहर पोलीस स्टेशन यांना कळवले . त्यांनी घटनास्थळी पोहोचून पुढील कारवाई सुरू आहे . संबंधित गाडीचे फोटो सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद आहे .
>
> **प्रवीण पारधी, वनपरिक्षेत्राधिकारी**

# चंद्रपूरवर शिवकृपा : श्रावणात सापडली प्राचीन शिवलिंगे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** श्रावण मासाचे धार्मिक महत्त्व फार मोठे आहे. शंकर देवांना अतिशय प्रिय असलेला हा महिना. शिवभक्त हा संपूर्ण महिना शिवभक्तीत घालवीतात. श्रावण मासातील आजच्या पौर्णिमेलाच चंद्रपूरातून शिवभक्तांना सुखाविणारी घटना घडली. जिल्हातील चिमूर तालुक्यात येणाऱ्या नेरी येथे पार्वती मंदिर परिसरात खोदकामा दरम्यान दोन प्राचीन शिवलिंग सापडलीत. हे शिवलिंग मराठाकालीन असल्याचे इतिहास अभ्यासक अशोक सिह ठाकूर यांनी सांगितलं. एन श्रावण मासात शिवदर्शन झाल्याने भक्तांची मोठी गर्दी उसळली आहे.

चिमूर तालुक्यातील नेरी येथे हेमाळपंथी मंदिर आहे. राक्षस मंदिर म्हणुनही हे मंदिर प्रसिद्ध आहे.या मंदिर परीसरात असलेल्या पार्वती मंदिरा समोर सभा मंडपासाठी खोदकाम करण्यात आले. मात्र पुरातत्व विभागाने काम थांबवण्याची नोटीस दिली. त्यामुळे काम थांबवण्यात आले. खोदकाम केलेले खड्डे बुधवारी बुजविण्याचा कामाला सुरुवात करण्यात आली. खड्डे बुजवित असताना आजूबाजूची माती ओढताना दोन प्राचीन शिवलिंग



सापडलेत. यातील एक शिवलिंग काळ्या दगडात कोरलेला आहे. तर दुसरा पांढऱ्या दगडातील आहे. हे दोन्ही शिवलिंग मराठा काळातील आहेत. शंकर देवाकडे एखादे नवस बोललं. ते नवस पूर्ण झालं की श्रद्धेने मंदिर परिसरात भाविक शिवलिंग ठेवत असायचे. तशी प्रथा होती. एखाद्या भक्ताने ठेवलेले हे शिवलिंग असावे, असे अशोक सिहं ठाकूर यांनी सांगितले.

# ईस्लापूर बाजार समितीची तिरंगी लढत; आ.भीमराव केराम, प्रदीप नाईक सत्तेसाठी साथ-साथ

आधुनिक केसरी न्यूज

दशरथ आंबेकर

**किनवट :** मौजे ईस्लापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ सदस्य पदासाठी निवडणूक चालू असून १८जागांपैकी ०३सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित १५ जागेसाठी एकुण ४५ उमेदवार निवडणूक रिंगणात आपले नशीब आजमावत आहे. ईस्लापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ निवडणूक २०२३-२०२८साठी विविध राजकीय पक्षांनी आघाडी करुन पॅनलची निर्मिती केलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने किनवट-माहुर विधानसभा मतदारसंघात परस्पर विरोधी असलेले भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार गट व शिवसेना उध्दव.बा.ठा.गट यांचे कार्यकर्ते सत्तेसाठी एकत्रित येऊन, शेतकरी कामगार विकास पॅनल या नावावर निवडणूक लढवत आहेत. आजी, माजी आमदारांचाआशीर्वाद घेऊन हे कार्यकर्ते एकत्रित प्रचार करताना दिसतआहेत. जे राज्यात नाही ते मौजे ईस्लापूर बाजार समितीमध्ये सत्तेसाठी विचित्र आघाडी झाल्याने जनता आश्चर्य व्यक्त करत आहे. या निवडणूकीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष पुरस्कृत शेतकरी संघर्ष पॅनल आणि भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पुरस्कृत शेतकरी कष्टकरी, बळीराजा विकास पॅनल स्वतंत्र लढत असल्यामुळे निवडणुका तिरंगी होत आहे. सर्व पॅनलचे उमेदवार आम्ही या पदासाठी लायक असल्याचे मतदारांना पटवून सांगतआहेत. सेवा सहकारी सोसायटी मतदार,ग्रामपंचायत मतदार,हमाल मापाडी मतदार, व्यापारी मतदार यांना गावोगावी भेट देत असून,त्यांचा प्रचार जोरात चालू आहे. भविष्यात होणाऱ्या निवडणूका साठी ही रंगीत तालिम असुन कार्यकर्ते आनंदीत झाले असले तरी,मतदार राजा या विचित्र आघाडीला निवडुन देतील काय? किंवा काही चमत्कार घडेल? तसेच धनशक्तिच्या जोरावर विजय प्राप्त होईल काय? कारण याठिकाणी शेतकरी मतदार असुन, येणाऱ्या काळातचं विजय, पराजय समजणार आहे. ईस्लापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ निवडणूक साठी ०२सप्टेंबर रोजी मतदान होणार असून, ०३ सप्टेंबर रोजी मतमोजणी होईल.

# उमदी आश्रमशाळेतील विषबाधाप्रकरणी पाच जणांवर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील उमदी येथिल समता प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील मुलांना कार्यक्रमातील राहिलेले शिल्लख जेवण दिल्याने १६७ मुलांना विषबाधा झाल्याप्रकरणी समाज कल्याण विभागाकडून पाच जणांवर गुन्हे नोंद करण्यात आले आहे. उमदी येथिल समता आश्रमशाळेतील मुलांना रविवारी चोळीच्या कार्यक्रमातील राहिलेले जेवण संध्याकाळी जेवणात देण्यात आले होते त्यामुळे १६७ मुलांना विषबाधा झाली होती. मुलांची माडग्याळ, जत, कवठेमहांकाळच्या ग्रामिण रुग्णालय व मिरज च्या शासकिय रुग्णालयात उपचार करण्यात आले. जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात खळबळ माजवणारी घटना घडल्याने तातडीने चौकशी करत समाज कल्याण विभागाकडून दोषी आढळल्याने दोन मुख्याध्यापक, दोन अधिक्षक व संस्थेच्या सचिव असे पाच जणांवर गुन्हे नोंद करण्यात आले आहे. गुन्हे नोंद करण्यात आलेल्यांमध्ये १) श्रीशैल कलाप्पा होर्तीकर २)सुभाषचंद्र महादेवाप्पा होर्ती ३) सुरेश चनगोंडा बगली ४) विकास तुकाराम पवार ५) अक्कमहादेवी सिध्दण्णा निवर्गी सर्व रा. उमदी ता. जत अशी नांवे आहेत. यांच्यावर आश्रम शाळेतील विध्यार्थाना आश्रम शाळेत जेवण न बनविता बाहेरीत कार्यक्रमाकरीता बनविलेले शिल्लक राहिलेले जेवन निष्काळजीपणे व हायगईपणे विध्यार्थांना दिल्याने विषबाधा होवुन त्यांचे जिवीत व वक्तीगत सुरक्षितता धोक्यात आणण्याची कृती करुन विद्यार्थ्यांना दुखापत पोहचविल्या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आले आहे.



उमदी समता आश्रमशाळेतील मुलांना बाहेरील शिल्लख जेवण दिले गेले आणि समाज कल्याण विभाग खडबडून जागे झाले मात्र जिल्ह्यातील सगळ्याच आश्रमशाळेत याहून वेळी परीस्थिती नसून सर्व आश्रमशाळेत चौकशी होणे गरजेचे . . .

सरकार निवासी वस्तीगृहातील व आश्रमशाळेतील मुलांसाठी खाण्यापिण्यासाठी व स्वच्छता, राहणीमानासाठी कोठ्यावधी रुपयांची तरतुद करत असते पण अनेक संस्था संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून या निधिवर डल्ला मारुन मुलांना सुविधेपासून वंचित ठेवत असतात .

जिल्ह्यातील आश्रमशाळा, निवासी वस्तीगृहे, आणि प्राथमिक शाळेत देखिल शालेय पोषण आहार व्यवस्थापनात प्रचंड कुचराई करीत असल्याचे दिसून येते . कोणत्याही नियमावलीचे पालन न करता जेवण उघड्यावर शिजवणे, स्वयंपाकघरात स्वच्छता न ठेवणे, स्वयंपाक करणाऱ्या आचारीचे वैद्यकिय तपासणी नसणे अशा प्रकारच्या चुका सर्रास दिसत आहेत . याबाबत गटशिक्षणाधिकारी यांना विचारले असता उध्दट उत्तरे दिली जातात आणि या चुकांना पाठिशी घालण्याचे उद्योग सुरू आहेत .

# विद्यार्थ्यांनो, यशस्वी होण्यासाठी अपयश पचवायला शिका : डॉ. चेतना सोनकांबळे




आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अपयश ही यशाची पहिली पायरी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जीवनात येणाऱ्या अपयशाला पचवायला शिकलं पाहिजे. आजचं जग हे मल्टी टास्किंग आहे. परिश्रमाला दुसरा पर्यायी शब्द नाही. स्वतःमधील उणिवा बाजूला करून आवश्यक कौशल्य आत्मसात केली तर हमखास यश मिळते, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरविद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ. चेतना सोनकांबळे यांनी केले. त्या पडेगाव येथील सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालयात आयोजित विद्यार्थी स्वागत समारंभात मार्गदर्शन करताना बोलत होत्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे संचालक प्रा. सुनील मगरे, प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे, डॉ. राजू वानखेडे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. चेतना सोनकांबळे म्हणाल्या, एखादी व्यक्ती जीवनात यशस्वी होते म्हणजे त्याला ते यश एकाएकी मिळत नाही. तर त्या पाठीमागे व त्याचे कठोर परिश्रम, अपमान आणि अपयश पचवून तो पुढे गेलेला असतो." डॉ. सोनकांबळे यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात शिक्षण क्षेत्रात होणाऱ्या बदलासंबधी जाणीव करून दिली. प्रा. सुनील मगरे यांनी मनोगतात सांगितले की, क्रांतिबा जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्त्व सांगितले. त्यांच्या विचार कार्याचा आदर्श घेतला. बहुजन, अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकायला मिळावे या हेतूने अत्यंत कष्टपूर्वक सिद्धार्थ महाविद्यालय उभारले. विद्यार्थ्याला केंद्रस्थानी मानणे ही महाविद्यालयाची भूमिका आहे. प्राचार्य डॉ.मनोहर वानखेडे म्हणाले, आपण आयुष्यभर विद्यार्थी म्हणून शिक्षण घेणे आवश्यक आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो ते प्राशन करेल तो नक्कीच जीवनामध्ये सफल झाल्याशिवाय राहणार नाही. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.राजू वानखडे यांनी केले. तर आभार प्रा. सूरज परघरमोर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुकेशनी जाधव, डॉ. विनोद अंभोरे, रामकृष्ण जाधव, अनिता काकरवाल, निकिता तुपे, मोईन तडवी, असित शेगावकर, श्रीकांत पातोडे, सुचिता अवसरमल, संतोष अंभोरे, प्रमोद धुळे यांनी परिश्रम घेतले.



# संस्कार गरडने आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत भारताला मिळवून दिले मानाचे स्थान

आधुनिक केसरी न्यूज

**जयप्रकाश बागडे**

**शेवगाव :** तालुक्यातील बालमटाकळी येथील संस्कार योगेश गरड या सतरा वर्षीय युवकाने काठमांडू नेपाळमध्ये नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय कबड्डी सामन्यात मानाचे स्थान पटकावून भारताला विजय मिळवून दिल्याने अहमदनगर जिल्ह्यातुन संस्कारचे अभिनंदन होत असून बालमटाकळी येथे अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त ग्रामस्थांकडून भव्य नागरी सत्कार सत्कार करण्यात आला. वर्ड कबड्डी फेडरेशनच्या माध्यमातून काठमांडू नेपाळमध्ये नुकत्याच झालेल्या इंडो नेपाळ आंतरराष्ट्रीय कबड्डी सामन्यात भारताने नेपाळचा 10 विरुद्ध 28 गुणांनी पराभव करीत विजेते पद पटकावले , 17 वर्षाखालील भारतीय संघाचा कर्णधार असलेल्या संस्कार योगेश गरड यांनी नऊ रेड पॉइंट मिळवीत विजयात मोलाचा वाटा मिळविला असून या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर संस्कारची भारतीय कबड्डी संघात बेस्ट रायडर म्हणून निवड झाल्याने आणि त्याने शेवगाव तालुक्यासह अहमदनगर जिल्ह्याचा मान उंचावल्याने बालमटाकळी येथे त्याचा भव्य नागरी सत्काराबरोबरच अभिष्टचिंतन सोहळाही करण्यात आला. सत्कार समारंभप्रसंगी संस्कार गरड यांचे वडील योगेश गरड, आई सुवर्णा गरड, सुमनबाई गरड, अर्जुनराव गरड, शिवाजीराव वाबळे सर , कल्याण मापरे सर, परमेश्वर जाधव सर, साध्वी शितलताई देशमुख, राहुल महाराज गरड, मोहनराव देशमुख, रामनाथ राजपुरे, नितीन काकडे, मयूर हुंडेकरी, कासमभाई शेख , सर्जेराव जिजा घोरपडे, अंधारे भाऊसाहेब, नामदेव घाडगे, भानुदास गलधर, अशोक खिळे, भारत घोरपडे, रोहिदास भोंगळे, अरुण बामदळे, रामजी तांबे, बाळासाहेब घोरपडे, हरिश्चंद्र राजे घाडगे, विष्णू वाघुंबरे, राजेंद्र राजपुरे, व्यंकट देशमुख, सचिन राजपुरे , गोकुळ घोरतळे, विक्रम बारवकर, आदीं ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे यांनी संस्कार योगेश गरड यांने आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत भारताला मानाचे स्थान मिळवून दिले आणि बालमटाकळी या ग्रामीण भागाचे नावलौकिक केल्याने त्यांनी पाच हजार रुपयांचे पारितोषिक संस्कार यास दिले.

# नवीन पिढीला व्यसनांपासून दूर ठेवणे गरजेचे : अपर जिल्हाधिकारी देशपांडे

## अमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मुलांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येयसमोर ठेवून ज्ञान, माहिती व कौशल्यासह त्यांचा विकास करण्याची जबाबदारी शिक्षकासह आपल्या प्रत्येकाची आहे. नवीन पिढीला व्यसनांपासून दूर ठेवणे गरजेचे आहे. याकरीता शाळा व महाविद्यालयीन परिसर तंबाखूमुक्त करावा, यासाठी पोलीस व शिक्षण विभागाचा समन्वय आवश्यक असल्याचे अपर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे म्हणाले. तसेच जिल्ह्यात अंमली पदार्थ विरोधी मोहिम अधिक व्यापक करण्याच्या सुचना बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील वीस कलमी सभागृह येथे जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी, मध्य चांदा वनविभागाचे वनसंरक्षक शेख तौसिक शेख हैदर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश कोंडावार, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक संजय पाटील, गुप्तचर विभागाचे उपकेंद्रीय अधिकारी वैभव सिंह, केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागाचे अधिक्षक विजयकुमार नायर, अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त श्री. बाघमारे, शिक्षणाधिकारी (माध्य.) कल्पना चव्हाण, डाक निरीक्षक एस. जी. दिवटे, डॉ. बंडू रामटेके आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

अपर जिल्हाधिकारी श्री. देशपांडे म्हणाले, शिक्षकांच्या व्यसनांबाबत शिक्षण विभागाने तपासणी करावी. शाळांचा परिसर तंबाखूमुक्त करावा. यासाठी शिक्षणाधिकाऱ्यांनी सर्व मुख्याध्यापकांना सुचित करावे. कृषी विभागाने जिल्ह्यात खसखस व गांजा पिकांची अवैध लागवड होणार नाही, याची दक्षता घ्यावी. कुरीअर व पार्सलच्या माध्यमातून अंमली पदार्थाची मागणी व पुरवठा होऊ नये यासाठी डाक विभागाने पार्सलची नियमित तपासणी करावी व दैनंदिन पार्सलचे स्कॅनिंग होत आहे का? याची खात्री करावी. त्यासोबतच पोलीस विभागाने अंमली पदार्थाच्या तस्करीला आळा घालण्यासाठी धाडसत्र मोहीम राबवावी. जिल्ह्यातील तसेच ग्रामीण भागातील दवाखाने, ग्रामीण रुग्णालये आदींचा परिसर तंबाखुमूक्त करण्याच्या सुचना अपर जिल्हाधिकारी श्री. देशपांडे यांनी दिल्या. यावेळी त्यांनी पोलीस विभागामार्फत अंमली पदार्थासदंर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती जाणून घेतली.





# लोणी येथे हर घर नल, हर घर जल

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील मौजे लोणी येथील ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन मिशन योजनेतून हर घर नल, हर घर जल योजनेच्या कामांचे महिला सरपंच गुलशन बी सत्तार पटेल यांच्या हस्ते उदघाटन करुन कामाला दि ३१ सुरुवात करण्यात आले. यावेळी उपसरपंच पुष्पा बळीराम दांडेकर ग्रा. पं. सदस्य मोईन पटेल, कैसर पटेल, संतोष दांडेकर, बानोबी गुलाबनबी पटेल, इंदुबाई सुदाम गायकवाड, रुबीना सांडु पटेल, अंगणवाडी सेवीका शोभाबाई चव्हाण सरपंचपती सरपंच सत्तार शेठ, पटेल उपसरपंचपती बळीराम दांडेकर, व्हा. चेअरमन गणेश दांडेकर, सोसायटी सदस्य अंबादास जाधव, ग्रामसेवक प्रशांत वाघमारे साहेब, तलाठी साळुंके आप्पा, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष सत्तार पटेल, सुखदेव आप्पा, कृष्णा बापु दांडेकर, सागर दांडेकर, नाजीम पटेल, गुलाबनबी पटेल, युनुस पटेल, रऊफ पटेल, मुक्तार पटेल, आरेफ पटेल, वैभव दांडेकर, संतोष दांडेकर, सुदाम गायकवाड, शंकर गरुड, असद पटेल, ग्रा. पं. शिपाई अंकुश जाधव, पा. पु. कर्मचारी सचिन अहिरे आदींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# पाटोदा तालुका तत्काळ दुष्काळ ग्रस्त जाहीर करावा : नागरगोजे

आधुनिक केसरी न्यूज

**पाटोदा :** तालुका दुष्काळ ग्रस्त जाहीर करण्यात यावा या मागणीचे निवेदन पाटोदा तहसील कार्यालयात देण्यात आले. पाटोदा तालुक्यातील कोणत्याही गाव तलाव अथवा पाजर तलावामध्ये पाणीसाठा शून्य टक्के असल्याने पिण्याचा पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे

अशातच महावितरण कंपनीने लोड शेडींगच्या नावाखाली विद्युत कंपनी लाईट बंद करून शेतकऱ्यांची कुचंबना करत आहे यामुळे शासनाने पाटोदा तालुक्यात पाऊस न पडल्याने शेतकरी राजा हवाल दिल झाला असल्यामुळे पाटोदा तालुका दुष्काळ ग्रस्त जाहीर करुन सरसकट शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान देण्यात यावा, तालुक्यातील सर्वांना स्वस्त धान्य दुकानात मोफत रेशन व गॅस देऊन मजूर ऊसतोड कामगाराना दुष्काळी कामे उपलब्ध करून देण्यात यावी, या मागणीचे निवेदन पाटोदा तहसील कार्यालयात भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस तथा पाटोदा शिरूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी दिले. यावेळी नगरसेवक सुशील कवठेकर,अनिल जायभाय, शाम हुले,सरपंच तात्यासाहेब लाड,संजय कांकरिया,प्रदीप नागरगोजे, थोरात मधुकर,राजपाल शेंडगे,सचिन गाडेकर, चंद्रशेखर साठे, गणेश खाडे,करण तांदळे,रोहित गर्जे,यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते

# तूरडाळ आता १६० ते १७० रुपये किलो

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** ऐन सणासुदीत तूरडाळ महाग झाली आहे. दोन महिन्यांपूर्वी १०० रुपयांवर असलेली तूरडाळ आता १६० ते १७० रुपये किलोवर गेली आहे. हरभरा डाळ, उडीद डाळ, मसूर डाळ आणि मूग डाळींच्या दरातही दोन महिन्यांत सरासरी २० रुपयांची वाढ झाली असून, डाळींच्या दरातील तेजी वर्षभर कायम राहण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी झालेले कमी उत्पादन आणि जागतिक बाजारातील कडधान्यांच्या चढया दरामुळे देशांतर्गत बाजारात डाळींच्या दरात वाढ नोंदविण्यात आली आहे. तूरडाळ दोन महिन्यांत १०० ते ११० रुपयांवरून १६० ते १७० रुपयांवर गेली आहे. हरभरा डाळ ५७ ते ५८ रुपयांवरून ७० रुपये प्रति किलोवर गेली.

# राष्ट्रवादी महिला काँग्रेस शहर उपाध्यक्षपदी गाडेकर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :**महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी महिला काँग्रेस पार्टीच्या छत्रपती संभाजीनगर शहर उपाध्यक्षपदी सौ. सुरेखा गुलाबराव गाडेकर यांची नियुक्त झाल्याबद्दल वार्डातील नागरिकांनी व कार्यकर्त्यांनी शिवशंभूच्या आशीर्वादाने शुभेच्छा दिल्या ' प्रा शिवाजी ढेपले ( महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना कार्यकारणी सदस्य ) प्रा बाळकृष्ण शेवंते, गुलाबराव गाडेकर, प्रमोद खाडे, विजय पवार धुमक, बोडखे बलांडे साहेब, सखाराम भोजने आदींची उपस्थिती होती.



# साहित्य जगत मराठी साहित्य संमेलनाच्या 'लोगो'चे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज



**मेहकर :** चनखोरे कॉलनी येथील 'साहित्य जगत' या मासिकाच्या कार्यालयात साहित्य जगत या मासिकाच्या मुख्य संपादिका गीता भगवान राईतकर यांच्या हस्ते साहित्य जगत मराठी साहित्य संमेलनाचा 'लोगो' चे प्रकाशन करण्यात आले. यावेळी मेहकर शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्ञानदेव मानवतकर, साहित्य जगतचे कार्यकारी संपादक रामदास राजेगांवकर, जेष्ठ पत्रकार व साहित्य संपादक भगवान राईतकर उपस्थित होते. साहित्याला समर्पित असलेल्या साहित्य जगत या मासिकाच्या वतीने आयोजित एक दिवसीय साहित्य जगत मराठी साहित्य संमेलनाचे १ आक्टोबर २०२३ ला आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने साहित्य जगत मराठी साहित्य संमेलन या संमेलनाच्या लोगो चे प्रकाशन पत्रकार परिषदेत करण्यात आले. यावेळी साहित्य जगत मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित कार्यक्रमाविषयी सांगताना भगवान राईतकर म्हणाले की, संमेलनाची सुरुवात ग्रंथ दिंडी होईल. त्यानंतर उद्‌घाटनाचा कार्यक्रम, कथाकथन सत्र, निमंत्रित कवी व कवियत्रींचे कवी संमेलन आणि समारोप अशाप्रकारे एकदिवसीय संमेलनाचे कार्यक्रम आहेत. संमेलनासाठी आयोजन समिती आणि स्वागत समितीचे गठन करण्यात आल्याचे रामदास राजेगांवकर यांनी सांगितले.

# कन्नड येथे शालेय कुस्ती स्पर्धेला उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** तालुका क्रिडा संकुलन येथे शालेय तालुकास्तरीय पावसाळी कुस्ती स्पर्धेला दिनांक 30/08/2023 रोजी क्रीडा संकुल येथे प्रारंभ करण्यात आले. यावेळी उद्‌घाटक म्हणून विजयकुमार ठाकूरवाड उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले क्रीडा संयोजक शाम खोसरे तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य व क्रीडा मार्गदर्शक प्रवीण शिंदे क्रीडा मार्गदर्शक अविनाश काळे, तालुका खो-खो संघटनेचे सचिव मुक्तानंद गोस्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वयोगट 14,17,19 मुले व 14,17,19 मुली गटातील फ्रीस्टाईल व ग्रीको सर्व वजन गटातील कुस्त्या घेण्यात आल्या. शेवटची कुस्ती पत्रकार गोरख पाटील, गोरख चव्हाण, प्रमोद चव्हाण यांच्या हस्ते घेण्यात आली यावेळी राष्ट्रीय खेळाडू कुस्तीचे पंच म्हणून विजयसिंग बारवाल व यशस्वीतेसाठी डॉ. लक्ष्मण चव्हाण, राकेश निकम, करण राठोड, अजित खंबाट आदींनी परिश्रम घेतले.



# विविध क्षेत्रात सेवा करणाऱ्या बांधवांना राखी बांधून रक्षाबंधन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुकाअध्यक्षा सौ. ऐश्वर्या अभिषेक पा. गाडेकर, भाजपा महिला मोर्चाच्या वतीने रक्षाबंधननिमित्त "स्नेह यात्रा" कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून विविध क्षेत्रात सेवा करणाऱ्या बांधवांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला आहे. पोलीस, वाहतूक पोलीस, भारतीय जवान, सुरक्षा दलातील कर्मचारी, रिक्षा /टॅक्सी / बस चालक, डिलिव्हरी बॉईज, अग्रणी सामाजिक / सेवाभावी संस्था, रक्तदाते मंडळी, यांना भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा तर्फे राखी बांधून बंधुत्वाच्या नात्यात जोडले जावे याकरिता राज्यभरात भाजपा महिला मोर्चाच्या वतीने अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरा करण्यात येत आहे. यावेळी भाजपा महिला मोर्चा फुलंब्री तालुकाअध्यक्षा सौ. ऐश्वर्या अभिषेक पा. गाडेकर, भाजपा महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस गंगाताई ताठे व भाजपा महिला मोर्चाच्या पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# योगशिक्षकांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** परभणी जिल्ह्यातील योग शिक्षक संघटनेच्या वतीने माननीय मुख्यमंत्री यांना विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले.

याबाबत निवेदनात खालील मागण्या असुन त्यामध्ये सध्या योग शिक्षकांना 500/- रुपये ऐवजी 100/- रुपये मानधन करण्यात यावे, आरोग्य केंद्र उपकेंद्र या ठिकाणी योग्य सत्र घेण्यासाठी प्रवास भत्ता 300/- रुपये देण्यात यावा, सामुदायिक आरोग्य अधिकारी कायमस्वरूपी प्रतिमाह मानधन देण्यात यावे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, ग्रामीण भागातील जनतेला योगा बाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करून नागरिकांचे आरोग्य जोपासण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आम्ही करतो 2020 ते 21 पासून सध्याच्या धकाधकीच्या काळात योगकार्य ही काळाची गरज बनली असून आरोग्य केंद्र या ठिकाणी योग शिक्षक वाहनासह साहित्य घेऊन जावे लागते. सध्याचे मानधन हे अपुरे असल्याने प्रतियोगसत्र 100/- रुपये देण्यात यावे तसेच प्रवास भत्ता म्हणून 300/- रुपये देणेही गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे. माननीय मुख्यमंत्री साहेब यांनी समुदाय आरोग्य अधिकारी प्रमाणे अकरा महिने अंतर्गत 11 महिने चे मानधन कायमस्वरूपी आम्हाला देण्यात यावे. यामुळे आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चांगल्या प्रकारे भागू शकतो तरी सन्माननीय मुख्यमंत्री साहेबांनी मागण्या मान्य करण्यात यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली असून सदरील निवेदनावर योग शिक्षक परभणी जिल्हा संघटनेचे अध्यक्ष गजानन चौधरी, जिल्हा सचिव लक्ष्मण निरस जिल्हा समन्वयक सौ.विद्या खंदारे ,वसंत पारवे व जिल्ह्यातील अनेक योगेश शिक्षकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# पाच वर्षांपूर्वी मुद्रांक शुल्क कमी भरले म्हणून शेतकऱ्यांची लूट

## धर्माबाद रजिस्ट्री कार्यालयातील प्रकार : अधिकाऱ्यांच्या चुका, शेतकऱ्यांना सजा

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** येथील दुय्यम निबंधक कार्यालयात पाच वर्षांपूर्वी, रजिस्ट्री करताना शेतकऱ्यांनी मुद्रांक शुल्क कमी भरणा केले म्हणून सदरील शेतकऱ्यांना सतत नोटीस बजावली जात असल्यामुळे शेतक-यांची झोप उडाली आहे. अधिकारी यांचा चुका, शेतकऱ्यांना सजा अशी अवस्था येथील कार्यालयात झाली असल्यामुळे केवळ शेतकऱ्यांची आर्थिक लूट केली जात असल्याने येथील अधिकारी बद्दल संताप व्यक्त होत आहे. धर्माबाद तालुक्यात सन २०१७ मध्ये अनेक शेतकऱ्यांचे शेतीची रजिस्ट्री येथील दुय्यम निबंधक कार्यालयात झाले. शासनाच्या परिपत्रकानुसार व जमिनीच्या मुल्यांकन नुसार मुद्रांक शुल्क चार टक्के व नोंदणी फी एक टक्का यानुसार येथील दुय्यम निबंधक अधिकारी शिंदे यांनी रजिस्ट्री केली.या घटनेला पाच वर्षे उलटले आता येथील दुसरे नुतन रुजु झालेले दुय्यम निबंधक अधिकारी आर.पी. गायकवाड यांनी शेतकऱ्यांकडून पैसे कसे काढायचे अशी शक्कल लढवून सन २०१७ मध्ये झालेले रजिस्ट्रीचे मुद्रांक शुल्क पुर्वीच्या अधिकारी यांने कमी भरणा केला आहे ते आता परत डबल शुल्क भरावे लागते अशी नोटीसा चाळीस शेतकऱ्यांना दिल्याने शेतकरी हतबल झाले असून शेतकऱ्यांत रोष निर्माण झाला आहे.सतत शेतकऱ्यांना नोटीस, तुम्हच्या शेतीवर बोजा पडेल, कारवाई होईल, असी भीती रजिस्ट्री कार्यालयातुन दिली जात आहे. या भीतीपोटी काही अज्ञानी शेतकरी भीतीने मुद्रांक शुल्क भरले तर काही शेतकरी मुद्रांक शुल्क भरले नाहीत. या विनाकारण नोटीस बद्दल संतापाची लाट उसळली आहे. मार्च ते जुलै पर्यंत तीन चार नोटीस



बजावली आहेत. दूष्काळ परिस्थितीत पन्नास पन्नास हजार रुपये कुठून आणणार अशी चिंता शेतकऱ्यांत वाटली असुन शेतकऱ्यांत तीव्र संताप होत आहे. सन २०१७ मध्ये दुय्यम निबंधक अधिकारी यांनी मुद्रांक शुल्क कमी भरणा लावला म्हणून आताचे अधिकारी आर.पी. गायकवाड यांनी डब्बल रुपये भरा म्हणून शेतकऱ्यांना नोटीसा दिले. शेतीचे मुल्यांकन काढणारे, मुद्रांक शुल्क, फी लावणारे त्यांच्याच कार्यालयातील अधिकारी आहेत, मग चुका कोणी केली ? शेतकऱ्यांनी केली का ? जेवढी मुद्रांक सांगितले तेवढे शेतकऱ्यांनी त्यावेळी भरले, चार वर्षे उलटले आता कशी जाग आली ? एक नाही, दोन नाही तब्बल चाळीस शेतक-यांचे चुका कशे होतात ? अधिकारी चुका करतात तर अधिकारी यांनी फी भरुन घ्यावे ? त्यांचा चुका शेतकऱ्यांना का सजा ? असा सवाल शेतकऱ्यांनी केला आहे. केवळ शेतकऱ्यांकडून पैसे काढण्याचा प्रकार येथील अधिकारी करित आहेत अशी उलटसुलट चर्चा शेतकऱ्यातून होत आहे.

१) सन २०१७ मध्ये दुय्यम निबंधक अधिकारी यांनी मुद्रांक शुल्क चुकुन कमी भरणा लावला असावा असे वाटते .आम्ही नोटीस शेतकऱ्यांना दिली, शेतकऱ्यांनी भरा म्हणत नाही नको भरा म्हणत नाही ,हे मला माहित नाही वरिष्ठांकडे कळवतो असे उडवा उडवीचे उत्तर दुय्यम निबंधक अधिकारी आर .पी . गायकवाड यांनी दिले .

२) सन २०१७ मध्ये मी विकत घेतलेल्या ४१ आर .जमीनीची रजिस्ट्री केली .त्यावेळी जसे साहेबांनी सांगितले त्या पध्दतीने मुद्रांक शुल्क भरले आणि रजिस्ट्री झाली .पाच वर्षे झाले अचानक आता याच कार्यालयातून नोटीस आली .तुम्ही मुद्रांक शुल्क कमी भरले आहे पैसे भरा मी थक्क झालो . त्यांनी केलेल्या चुका आम्हा गरीब शेतकऱ्यांना सजा . पुर्विच शेतकरी संकटात असताना असा अधिकारी मुळे फाशी घेयाची वेळ आली आहे, असे मत तालुक्यातील बेल्लूर ( खु) येथील शेतकरी राम कांबळे यांनी सांगितले .

# जळगाव जिल्ह्यात १३ गावांना टँकरद्वारे पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जिल्ह्यात पावसाअभावी जलसंकट उभे राहण्याची



शक्यता असून, आतापर्यंत सरासरीच्या अवघा ५३ टक्के पाऊस झाला आहे. पावसाअभावी जिल्ह्यातील लहान-मोठ्या प्रकल्पांत सरासरीपेक्षा कमी म्हणजे ४२.५३ टक्के जलसाठा असून, अग्नावती आणि हिवरा हे मध्यम प्रकल्प कोरडेठाक आहेत. गतवर्षी २८ ऑगस्टपर्यंत जिल्ह्यातील सर्व प्रकल्पांमध्ये ७३.६७ टक्के जलसाठा होता. सप्टेंबरमधील परतीच्या पावसाकडे शेतकऱ्यांचे डोळे लागले आहेत. जिल्ह्यात सद्यःस्थितीत १३ गावांत १५ टँकर सुरू आहेत. जून कोरडा गेला. जुलैमध्ये बऱ्यापैकी पाऊस झाला. ऑगस्टमध्ये पावसाचे प्रमाण तुरळकच राहिले. पिके करपू लागली आहेत. सद्यःस्थितीत पिकांना पाणी देण्याची गरज आहे. चाळीसगाव, पाचोरा, भडगाव, पारोळा, जळगाव, चोपडा, अमळनेर, एरंडोल, धरणगाव परिसरात यंदा दुबार-तिबार पेरणी करावी लागली आहे. जिल्ह्यातील हतनूर, गिरणा व वाघूर प्रकल्प मिळून सुमारे ४२.११ टक्के जलसाठा असून, अग्नावती व हिवरा प्रकल्प कोरडेठाक आहेत. बोरी, बहुळा, भोकरबारी, मन्याड या प्रकल्पांनी तळ गाठला आहे. चाळीसगाव तालुक्यातील पिंपळगाव, विसापूर तांडा, अंधारी, हातगाव, करंजगाव, कृष्णापूर, जामनेर तालुक्यातील मोरगाव, रोटवद, जळांद्री बुद्रुक, सोनारी, करमाड, पाचोरा तालुक्यातील लोहारा व भडगाव तालुक्यातील तळबंद तांडा या गावांना १५ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.



# राष्ट्रवादीचे दिग्गज नेते माजी मंत्री मनोहर नाईक यांना जबर धक्का

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** राज्यात भाजपा-शिवसेना शिंदे गटाची सत्ता होती. आता राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित दादा गट सत्तेत सहभागी झाले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे दिग्गज नेते माजी मंत्री मनोहर नाईक यांचे सुपुत्र आ. इंद्रनील नाईक यांनी अजित पवार यांच्यासोबत गेल्याचे घोषित केले आहे. मात्र मुळ राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते शरद पवार यांच्या गटात असल्याची माहिती राष्ट्रवादी कांग्रेस पार्टीचे पदाधिकारी ॲड. आशिष देशमुख यांनी दिली आहे. या संदर्भात चर्चा करण्यासाठी १ सप्टेंबर रोजी कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. पुसद विधानसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादीचा गड मानला जायचा. राष्ट्रवादीचे दिग्गज नेते माजी मंत्री मनोहर नाईक या मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून यायचे. 2014 च्या मोदी लाटेत मनोहर नाईकांनी गड राखला होता. मात्र राष्ट्रवादीत अजित पवार यांनी बंड पुकारात आपला वेगळा गट निर्माण केला व सत्तेत सामील झाले. राज्यातील अनेक आमदार त्यांच्यासोबत सत्तेत आले. राष्ट्रवादीचे दिग्गज नेते माजी मंत्री मनोहर नाईक यांचे सुपुत्र इंद्रनील नाईक यांनी अजित पवारांसोबत असल्याचे घोषित केले. मात्र नाईक घराण्यांनी आपल्या सोबत विश्वासघात केला व सत्तेत सामील झाले. अनेक दिग्गज नेत्यांना व कार्यकर्त्यांना विश्वासात न घेत सत्तेत आल्याचा आरोप पुसद परिसरातील राष्ट्रवादी कार्यकर्त्यांनी केला. १ सप्टेंबर रोजी कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मूळ राष्ट्रवादीत आजही शरद पवारांसोबत असंख्य कार्यकर्ते आहे. हे या मेळाव्यातून दाखवून देण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी नेते व कार्यकर्ते करताना दिसून येत आहे.



# शासकीय तंत्रनिकेतन ग्रंथालय इमारतीचा शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील नागरिकांसाठी शासनाच्या विविध इमारतीसाठी आ.फारुख शाह यांनी शेकडो कोटी रुपयांचा निधी आणला आहे तो एक रेकॉर्ड आहे त्याचाच एक भाग म्हणून सार्वजनिक बांधकाम उपविभाग धुळे अर्थसंकल्पीय तरतुदी अंतर्गत शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन संस्थेच्या परिसरात ग्रंथालय इमारत व आवार भिंतीचे बांधकाम करणे कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांच्या हस्ते करण्यात आला. धुळे शहरातील एमआयडीसी येथील विभागीय कार्यालय फायर स्टेशन आदिवासी प्रकल्प इमारत दारूबंदी कार्यालय जिल्हा परिवहन कार्यालय जजेस क्वार्टर, जिल्हा रुग्णालयाच्या नवीन 200 खाटांचे बांधकाम, हिरे मेडिकल येथील वस्तीगृह बांधकाम यासाठी आ.फारुख शाह यांनी शासनाकडून शेकडो कोटीच्या निधी आपल्या प्रयत्नाने शहरासाठी उपलब्ध करून दिला आहे. आजपर्यंत शहराच्या विविध कार्यालय इमारतीसाठी रेकॉर्ड निधी आणण्याचे काम आ.फारुख शाह यांनी केले आहे. तसेच सर्व कार्यालय एका छताखाली आणण्यासाठी प्रशासकीय इमारतीचे काम सुद्धा लवकर सुरू होणार आहे. या सर्व कामाच्या एक भाग म्हणून आज आ. फारुख शाह यांच्या हस्ते शासकीय तंत्रनिकेतन येथे ग्रंथालय व आवार भिंतीचे कामाचे शुभारंभ करण्यात आला.

यावेळेस आ.फारुख शाह यांचेसोबत परिसरातील प्रतिष्ठित नागरिक व शासकीय तंत्रनिकेतन येथील प्राचार्य डॉ. वाडेकर, के.आर.पवार,डॉ.अन्सारी,इतर शिक्षक वृंद सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आर.आर. पाटील, उपअभियंता किरण पाटील,राहुल माळी, शहेबाज शाह, नगरसेवक नासिर पठाण,नगरसेवक गनी डॉलर, नगरसेवक आमिर पठाण,डॉ. दीपश्री नाईक, डॉ.बापुराव पवार , आसिफ शाह,प्यारेलाल पिंजारी, निजाम सैय्यद, कैसर अहमद,नजर पठाण, अकीब अली, माजिद पठाण, जी ड्डुया पहिलवान,सिराज मलिक, अजहर सय्यद,शहजाद मंसूरी, शाहरुख कुरेशी, मोईन शेख,साकीब शाह, जुबेर शेख,समीर शाह, नदीम मिर्झा, मुजाहीद बागवान, साजिद शाह आदी उपस्थित होते.

# लम्पी रोगसंदर्भात तहसीलमध्ये आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात पशुधन गुरांवर लम्पी चर्मरोगावर उपाययोजना व तातडीने उपचार यासाठी तहसील कार्यालयात तहसीलदार स्वरुप कंकाळ यांच्या मुख्य उपस्थितीत आढावा बैठक दि.३०घेण्यात आली. चर्मरोगाचे (लम्पी) प्रदुर्भाव वाढु नये म्हणून करायचे उपाय व त्यांवर मार्गदर्शन लसीकरण पशुधन सद्याची स्थिती, डास गोचीड गोमाशा चिलटे यांच्यापासून बचाव उपाय याचा बैठकीत आढावा घेण्यात आला व मार्गदर्शन करण्यात आले. तर प्रत्येक गावात लम्पी दुतच्या साह्याने माहिती व उपचार व उपाय करण्यात येतील अशा सुचना ही करण्यात आल्या.


यावेळी पशुधन अधिकारी डॉक्टर विष्णू खोडवे, गटविकास अधिकारी नाईक, डॉक्टर मोराळे, डॉक्टर देशमुख, डॉक्टर शुभम विजापूरे, तर पशुधन पर्यवेक्षक काळे,मोती कैलास,विजय इटवले यांची उपस्थिती होती.

# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळातर्फे वार्षिक ऋक श्रावणी उपाकर्म विधी उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** स्वर्गीय शंतनू चौधरी सरांच्या प्रेरणेने आणि अमोल पांडव यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी वार्षिक ऋक श्रावणी उपाकर्म विधी उपक्रम घेण्यात आला, या उपक्रमाला खूप छान प्रतिसाद मिळाला. तसेच या वर्षी ५५ ते ६० सदस्यांनी यामध्ये सहभाग नोंदविला. या उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख म्हणून नरेश पटवर्धन, मिलिंद दाभाडकर यांनी काम यशस्वीरित्या पार पाडले. तसेच मंडळाचे अध्यक्ष नरेश जोशी, उपाध्यक्ष रवी जेऊरकर, सचिव अनंत कुलकर्णी, कोषाध्यक्ष अंबादास कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य श्रीपाद मुगुटे, वैभव देशपांडे, पदाधिकारी प्रशांत दाभाडकर, तसेच महिला अध्यक्षा मोनिका शंतनू चौधरी, कार्यकारिणी सदस्य मयुरी दाभाडकर, महिला पदाधिकारी कल्पना जोशी, योगिनी देशमुख, उत्कर्षा पारनेरकर, सीमा कस्तुरे, विभा देशपांडे या सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला असे देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण समाज मंडळचे सचिव अनंत कुलकर्णी यांनी सांगीतले व सर्वांचे आभार मानले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद




# ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकरांचा सपत्नीक दैनिक लोकमतद्वारे यथोचित सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** दैनिक लोकमतच्या वतीने विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या ज्येष्ठांचा यथोचित सन्मानित करण्यात आले. तीसहून अधिक कला अवगत असणारे एक कलासंपन्न व्यक्तीमत्व म्हणून कार्यरत असणारे सुधीर कोर्टीकर आणि अनेक कला गुण अवगत असणाऱ्या त्यांच्या पत्नी नयन कोर्टीकर यांची निवड करण्यात आली. ज्येष्ठ नागरिक सन्मान सोहळा अशा आगळ्यावेगळ्या सन्मान सोहळ्यासाठी छत्रपती संभाजी नगरमधील विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यासाठी छत्रपती मल्टीस्टेटचे संतोष भंडारी यांनी पुढाकार घेतला होता. ज्येष्ठ नागरिक सन्मान सोहळा या अनोख्या सन्मान सोहळ्यासाठी सुप्रसिद्ध कवी फ.मु.शिंदे, सुप्रसिद्ध उद्योगपती राम भोगले, एमआयटीचे अध्यक्ष यजवीर कवाडे, उद्योगपती पुखराज पगारीया, खासदार इम्तियाज जलील, छत्रपती उद्योग समुहाचे अध्यक्ष संतोष भंडारी या सर्वांच्याच हस्ते सुधीर कोर्टीकर व नयन कोर्टीकर या कलासंपन्न दापंत्याचा शाल, मोत्याची माळ, मिठाई आणि काही भेटवस्तू देवून यथोचित सन्मान करण्यात आला. लोकमत भवनातील मोठ्या हॉलमध्ये झालेल्या समारंभास विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सुधीर कोर्टीकर आणि सौ.नयन कोर्टीकर या कलासंपन्न दापंत्याचा इतका मोठा सत्कार दैनिक लोकमतमधे झाल्यामुळे सर्वच स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे हे बाकी खरं.

# मेट्रोच्या पुलाला तडे, गाडीचा वेग मंदावला

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** बांधकामाच्या क्षेत्रात अनेक पुरस्कार पटकावणाऱ्या महामेट्रोला आता कामातील त्रुटींमुळे नामुष्कीला तोंड द्यावे लागत आहे. नागपुरात कामठी मार्गावर गड्डीगोदाममधील आणि वर्धा मार्गावरील मेट्रोच्या पुलाला तडे गेल्याने त्यावरून धावणाऱ्या मेट्रोची गती कमी करण्यात आली आहे. मात्र, ही किरकोळ स्वरुपातील तांत्रिक त्रुटी असून ती दूर करण्यासाठी काम सुरू करण्यात आल्याचे महामेट्रोकडून कळवण्यात आले आहे.

नागपुरातील मेट्रोच्या मार्गावर दोन डबल डेकर पूल आणि इतर तत्सम बांधकामामुळे महामेट्रोचे देशभर नाव झाले. या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल पुरस्कारही मिळाले. आता मात्र त्यातील त्रुटी दिसून येत आहे. कामठी मार्गावरील गड्डीगोदामजवळील चार पदरी उड्डाण पुलाला तडे गेल्याने तेथून धावणाऱ्या मेट्रोची गती प्रतितास ८० कि.मी.वरून प्रतितास ३० कि.मी. इतकी कमी करण्यात आली आहे. यापूर्वी वर्धा मार्गावरील न्यू एअरपोर्ट ते खापरी दरम्यानच्या एका पुलालाही असेच तडे गेले होते. त्यामुळे तेथील वाहतूक एका दोन ट्रॅकवरून एका ट्रॅकवर करण्यात आली होती. यासंदर्भात महामेट्रोने तपशीलवार निवेदन प्रसिद्धीला दिले आहे. त्यानुसार गड्डीगोदाम येथे ८० मीटर स्टील गर्डर पूल असून तेथे तडे गेल्याचे (ट्रॅक सेटलमेंट) आढळून आले आहे. ही किरकोळ त्रुटी असून यामुळे दोन्ही ट्रॅकवर परिणाम झाला आहे. पुलाला महामेट्रो आणि कंत्राटदार कंपनीच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली. मेट्रोच्या सुरक्षित संचालनासाठी गती प्रतिसात ३० किलोमीटर इतकी कमी करण्यात आली. दुरुस्तीची कामे सुरू करण्यात आली आहेत.

# बहीणभाऊ नात्यातील कृतज्ञतेचे संस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** हिंदू संस्कृतीनुसार श्रावण पौर्णिमेला रक्षा बंधनचे सण साजरा केला जातो व तेच निमित्त साधून रायझिंग स्टार इंग्लिश स्कूलमधे शालेय विद्यार्थीनींनी शाळेतील विद्यार्थ्यांना राखी बांधून भाऊ मानले आहे. रक्तातील नाते असणारे भाऊ बहीण असोत की मानलेले.या नात्यामागचे भावनाच खुप पवित्र असतात व त्या नात्यप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजेच राखी पौर्णिमा होय व तेच निमित्त साधून रायझिंग स्टार इंग्लिश स्कूल मधे शालेय विद्यार्थीनींनी शाळेतील विद्यार्थ्यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरा केला. यावेळी शिक्षक वृंद यांनी मार्गदर्शन केले. मोठया उत्साहात राखी पौर्णिमा शाळेत साजरी करण्यात आली.





# एड्सग्रस्त मुला मुलींचे बालगृह येथे रक्षाबंधन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आदर्श मित्र मंडळतर्फे बाबा साई एड्स ग्रस्त मुला मुलींचे बालग्रह येथे आजच्या रक्षाबंधन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुपाली सत्यविजय देशमुख, प्रमुख पाहुण्या उमा राजेश मुंबरे, उपकेंद्रप्रमुख सौ.अश्विनी मुळे यांनी भुमिका बजावली. सुत्रसंचालन बापूसाहेब लगड यांनी केले तर आभार प्रदर्शन उपक्रमप्रमुख प्रतिक्षा मनोहरराव लघाने यांनी केले. मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रकांत काबंळे यांनी शांती मंत्र घेऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी ३० मुलां- मुलींना राख्या बांधण्यात आल्या. मुलीनींही मंडळाच्या पदाधिका-याना राख्या बांधल्या. शहा यांनी आजचे अन्नदान केले तर उमा मुंबरे आणि अश्विनी मुळे यांनी कु. रुपाली गावंडे या गरजु विद्यार्थीना MSCIT ची फिस व इतर शैक्षणिक साहित्यासाठी प्रत्येकी २५००/रु. रोख मदत केली. याप्रसंगी ब्रिजलाल बन्सवाल, मनोहरराव लघाने, साहेबराव कांडेकर, चंद्रकांत कांबळे, सत्यविजय देशमुख, मारुती आवलगावे, उदयकुमार मोरलवार, अर्जुनसिंह चव्हाण, दिलीप आसबे, चि. सार्थक बापूसाहेब लगड, मीरा मनोहरराव लघाने पा. मुळे, राजु मुंबरे इ. उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर